VOLUME 5 ISSUE 5 MAY 2020

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

Shivajinagar, Pune-411005. Maharashtra

# *MODLIB*

## *E-Bulletin of Library and Information Centre*




**Published by** : Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

**Editor** : Dr. Shantashree Sengupta, Librarian.

**Editorial Assistant** : Mrs. Sarika Sable

**E-mail** : librarian@moderncollegepune.edu.in

*Image Courtesy: <a href="https://www.freepik.com/free-photos-vectors/infographic">Infographic vector created by freepik - www.freepik.com</a>*

# Table of Contents


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Contribution towards the Society in COVID-19 Pandemic** | |
| | ***-Prof.Dr.Gajanan R. Ekbote and Prof.Mrs. Jyotsna G. Ekbote*** | **3** |
| 2 | **Progressive Education Society's Chairman** | |
| | ***Prof.Dr.Gajanan R. Ekbote invited as Resource Person*** | **4** |
| 3 | **Work of Appreciation of NSS Committee and Volunteers** | **5-6** |
| 4 | **Webinar and Faculty Development Programs organised during May 2020** | |
| | ***- Webinar on Plagiarism, It's Detection and Avoidance (08th May 2020)*** | **8-9** |
| | ***- Faculty Development Program organised by Modern College, Shivajinagar, Pune-5 (11th May to 25th May 2020)*** | **10-11** |
| | ***- Online Faculty Development for Schools and Colleges Managed by Progressive Education Society, Pune-5 (28th May to 3rd June 2020)*** | **12-15** |
| 5 | **Faculty Member invited as Resource Person** | |
| | ***- Dr. Shantashree Sengupta*** | **16-17** |
| 6 | **Modern Achievements** | |
| | ***- Priyanka Tikole*** | **18** |
| | ***- Saurabh Ramdas Pawar*** | **19** |
| | ***- Nikita Bahirat*** | **20** |
| 7 | **Newspaper Clippings** | **21-57** |

# CONTRIBUTION TOWARDS THE SOCIETY

10.5.2020- शिवाजीनगर येथून वाशीमकडे जाणारे मजूर शिवाजीनगर पोलिसांना आढळले. सदर मजुरांना त्यांच्या गावापर्यंत पोहोचण्यासाठी ट्रॅव्हल्सची व्यवस्था आमदार सिद्धार्थ शिरोळे व **नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे**, नगरसेवक आदित्य माळवे आणि संदीप काळे सभासद पुणे मनपा वृक्ष समिती या सर्वांच्या एकत्रित खर्चातून करण्यात आली. सदर मजुरांना फुड पॅकेट, मास्क सॅनिटायजर, पाण्याच्या बाटल्याचे वाटप करण्यात आले. या मजुरांच्या चेहऱ्यावरचा आंनद ओसंडून वाहत होता.यावेळी शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोपनार साहेब व ACP यादव यांनी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता केली. **प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आदरणीय प्रा. डॉ. गजानन एकबोटे सर** यांच्या प्रमुख उपस्थितीत मजुरांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.










# *Progressive Education Society's* Chairperson Prof. Dr. Gajanan R. Ekbote invited as Resource Person

MVPS's Arts and Commerce College, Vadner Bhairav Tal. Chandwad, Dist. Nashik and Savitribai Phule Pune University, Pune organized Online Faculty Development Program on **"Impact of Covid-19 on Education, Politics and Economy"** from **12th-14th May 2020. Prof. Dr. Gajanan Ekbote,** Chairman, *Progressive Education Society*, **Shivajinagar, Pune-5** was invited as resource person for this Online Faculty Development Program.



# WORK OF APPRECIATION

दिनांक १०/०५/२०२० रोजी पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयाच्या **राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अनिकेत बनसोडे, परितोष भोसले, शंकर ठाकूर आणि तनाया मोंढे** यांनी कात्रज च्या काही भागात ८ किरानाचे बॉक्स वाटले व त्या भागाचा सर्व्हे करून तेथील लोकांशी संवाद साधला.

हे काम मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव सर व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रभाकर वराडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले गेले.














# WORK OF APPRECIATION

दिनांक ११/०५/२०२० रोजी मॉडर्न महाविद्यालयाचे **स्वयंसेवक अनिकेत बनसोडे** यांनी प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव सर व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रभाकर वराडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिघी गावात २५ किराणाच्या बॉक्सचे वाटप केले. हे बॉक्स इन्फोसिसच्या **'स्पर्ष- अ हीलींग टच'** या संस्थेने दिले.




















# Webinar and Faculty Development Programs organized during May 2020

# Webinar on *'Plagiarism, it's Detection and Avoidance'*

On 8th May 2020, under the **'IPR Webinar Series'**, Staff Academy, IPR Cell and Library and Information Centre of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised Webinar on ***'Plagiarism, it's Detection and Avoidance'*** for faculty members of Modern College, Shivajinagar.

The stalwart Library and Information Science Professional Prof. Dr. Ramesh C Gaur, Dean and Director (Library and Information) & Head- Kalanidhi Division, IGNCA, Ministry of Culture, Govt. of India, New Delhi, presented the vast topic by covering every minute concept related to Plagiarism and Academic Integrity. The question answer session solved various doubts related to plagiarism, certain websites etc. It's always a pleasure to listen to Gaur Sir. The informative lecture was appreciated by all.


A very important topic for all researchers, teachers and students covering various concepts such as What is Plagiarism, types of plagiarism, how to detect, tools for avoiding plagiarism, Academic Integrity, Reference Management Tools, World famous examples, Role of Libraries, Predatory Journals, UGC CARE LIST etc.


We are thankful to all the Respected Management Members of Progressive Education Society, Shivajinagar Pune-5; Principal Dr.R.S Zunjarrao Sir for supporting us and always motivating us to conduct such Webinars.

We are also thankful to Prof. Sharad C. Chaudhari Sir, Vice Principal and Head, Department of Electronic Science ; Vice Principal Faculty of Commerce and Head, Department of Commerce Prof.Dr.A.V.Kamble Sir, all teachers and several student research scholars for participating in the Webinar and making it a successful one.

-Dr. Shantashree Sengupta,
Librarian


# Webinar on *'Plagiarism, it's Detection and Avoidance'*











# FACULTY DEVELOPMENT PROGRAM ORGANIZED BY MODERN COLLEGE, SHIVAJINAGAR

Two weeks Online Faculty Development Program on ***'e-content Development and Use of Online Teaching Tools and Services'*** was organized by IQAC and e-content Development Center, Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 from 11th May to 25th May 2020. Topics related to Use of G-suite, Institutional email Ids, Using Google Drive, Using Google Docs, Creating own YouTube Channel and Creating and using Google form, OBS Studio, Open Shot Video Editor, Whiteboard Animation using Renderforest were discussed during this program. Dr. Anjali Sardesai, IQAC Co-ordinator and Head, Department of Animation was the Resource Person for the FDP. Principal Dr.R.S.Zunjarrao inaugurated the Program in Online Mode on 11th May 2020. The Faculty Development Program was organised on MOODLE-LMS Platform through Google Meet.
















# FACULTY DEVELOPMENT PROGRAM ORGANIZED BY MODERN COLLEGE, SHIVAJINAGAR


The Valedictory Function of the Faculty Development Program was also conducted Online on 23rd May 2020. Several participants gave their feedback. Principal Dr. R.S.Zunjarrao and Prof.S.S.Deshmukh, Secretary, Progressive Education Society; Vice Principal and Head, Department of Computer Science appreciated the learning attitude of the 250 faculty participants of the FDP. An Online Examination of the FDP was conducted on 26th May 2020 on MOODLE-LMS. The Online Practical Sessions of the FDP conducted by Dr. Anjali Sardesai were very enriching which introduced several e-content Development Tools and Distribution Platforms required for Online Teaching.










# ONLINE FACULTY DEVELOPMENT PROGRAM FOR SCHOOLS AND COLLEGES MANAGED BY PROGRESSIVE EDUCATION SOCIETY, PUNE-5

## CONDUCTED BY PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE AND COMMERCE (AUTONOMOUS), PUNE-5




One week **Online Faculty Development Program** for Schools and Colleges managed by Progressive Education Society, Pune-5 was organised from 28th May 2020 to 3rd June 2020 on ***'E-content Development, E-learning and Effective use of tools in Teaching, Learning and Evaluation'.*** The Online FDP was inaugurated at the hands of Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote (Chairman, P. E. Society)." The FDP was arranged by P. E. Society in association with Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote (Chairperson, CDC) welcomed and guided participants. Prof. Dr. R. S. Zunjarrao Principal narrated objectives and success of this FDP.

**Online Faculty Development Program for Schools and Colleges Managed by Progressive Education Society, Pune 5**

**Organized by**

**Progressive Education Society**

Conducted by

**Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Pune 5**

**Schedule of FDP**

Time for **School Teachers** : 4.30 pm to 6.00 pm

Time for **College Teachers** : 12.00 noon to 1.30 pm

| Day / Date | Topic |
|---|---|
| Thursday<br>**28th May 2020** | **Inauguration Session** :<br>Address by Hon'ble Dr. G.R. Ekbote Sir<br><br>**Session 1**<br>Tools to create and store e-content |
| Friday<br>**29th May 2020** | **Session 2**<br>Tools to create and store e-content |
| Saturday<br>**30th May 2020** | **Session 3**<br>Developing e-content : part 1 |
| Sunday<br>31st May 2020 | Break Day |
| Monday<br>**1st June 2020** | **Session 4**<br>Developing e-content : part 2<br><br>**Session 5**<br>Conduction of online lectures using various apps |
| Tuesday<br>**2nd June 2020** | **Session 6**<br>Distribution of the e-content to students |
| Wednesday<br>**3rd June 2020** | **Session 7**<br>Online test / Quiz ( 30 minutes)<br><br>**Valedictory Function** ( 45 minutes) |

# ONLINE FACULTY DEVELOPMENT PROGRAM FOR SCHOOLS AND COLLEGES MANAGED BY PROGRESSIVE EDUCATION SOCIETY, PUNE-5


## Conducted by Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Pune-5

### Inauguration














# ONLINE FACULTY DEVELOPMENT PROGRAM FOR SCHOOLS AND COLLEGES MANAGED BY PROGRESSIVE EDUCATION SOCIETY, PUNE-5

## Conducted by Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Pune-5

One week Online Faculty Development Program from 28th May 2020 to 3rd June 2020 on ***'E-content Development, E-learning and Effective use of tools in Teaching, Learning and Evaluation'*** is concluded at the hands of Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote (Chairman, P. E. Society)."

In view of the present CORONA/COVID-19 situation in days to come teaching, learning and evaluation pedagogy will shift drastically. Its need of hour to upgrade and enhance technical skills of teaching staff. Realising this need, under the guidance of Hon'ble Prof. Dr. Ekbote Sir this six day's Webinar was arranged by the Progressive Education Society. This FDP is brain child of Prof. Dr. G. R. Ekbote Sir. In the first phase in all 500 Professors and Teachers have participated in the FDP. These are divided into two groups 250 Professors from the college's managed by PES and 250 school teachers from the schools managed by PES have attended the webinar. This is the first initiative taken by any educational institutions. Registration fees is not charged to the participants, its completely free. FDP was arranged by P. E. Society in association with Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote (Chairperson, CDC) welcomed and guided participants. Prof. Dr. R. S. Zunjarrao Principal narrated objectives and success of this FDP. Prof. Dr. Gajanan R. Ekbote concluded FDP and gave presidential speech he said "Change is the only Constant" staff members should change and adopt technology along with the time. He also expressed "If you don't Innovative, you will perish", "Survival is the fittest". Staff members should use technologies effectively in teaching learning and evaluation process. Being surgeon he had also narrated what all precautionary measures to be taken by staff members in the schools and colleges in the present CORONA/COVID-19 situation. He gave best wishes to participants and assured that, such type of activities will be continued in the society. He had announce Train the Trainer concept that, Further training in this regard will be given to the nominated staff members of the unit and that person will continue Training in respective unit. There will be constant follow up in this regard. He mentioned This FDP is successful and useful to the participants and they are immensely benefitted. Prof. Dr. Anjali Sardesai Head, Department of Animation , MCASC, Pune worked as the resource person for the Webinar. She delivered and conducted all sessions on E-content development, E-learning, use of tools in Teaching, Learning and Evaluation. YouTube channel and Website development, Google Apps and its effective usage and so on. On line test if participants is scheduled and digital certificates will be issued to all participants. Dr. Abhijit Satralkar and Prof. Dr. Deepti Bandavane gave feedback and shared experience on behalf of all the participants.

At the end Prof. Dr. Anjali Sardesai gave vote of thanks as a Coordinator of the FDP. FDP was concluded with the kind permission of Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir Chairman, Progressive Education Society, Pune.

**-Prof.Shamkant S. Deshmukh,**
**Secretary, P.E.Society**
**Vice Principal & Head, Department of Computer Science, MCASC, Pune-5.**

# ONLINE FACULTY DEVELOPMENT PROGRAM FOR SCHOOLS AND COLLEGES MANAGED BY PROGRESSIVE EDUCATION SOCIETY, PUNE-5


## Conducted by Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Pune-5

### Valedictory Program






















# Faculty Members invited as Resource Person

Dr. Shantashree Sengupta, Librarian was invited as Resource Person in Two Days State Level Webinar organized by K.R.M Mahavidyalaya, Nanded on **'Rebuilding of College Libraries for NAAC'** on **2nd May 2020**. Dr. S. Sengupta delivered her lecture on the topic ***'Preparation of College Libraries for NAAC'.***




**Schedule of Webinar**

**Date : 2nd & 3rd May 2020 Time 04.00pm to 06.00pm**

**Day First – 2nd May 2020**

| Time | Topic | Resource Person |
|---|---|---|
| 03.50 PM TO 04.00 PM | Test Call & Check Connectivity | |
| 04.00 PM TO 04.10 PM | Introduction of the Workshop | **Dr. Mrs. Medha R. Dharmapurikar** Librarian K.R.M. Mahila Mahavidyalaya, Nanded |
| 04.10 PM TO 04.20 PM | Inauguration | Inaugural Speech **Dr. Mrs. V. D. Deshmukh** Principal K.R.M. Mahila Mahavidyalaya, Nanded |
| 04.20 PM TO 04.45 PM | Key Note Address | **Dr. Mohan Kherde** Director Knowledge Resource Center, S.G.B. Amravati University, Amravati |
| 04.45 PM TO 05.00 PM | Question & Answers | Participants |
| 05.00 PM TO 05.45 PM | Preparation of College Libraries for NAAC | **Dr. Shantashree Sengupta** Librarian Modern College of Arts, Science & Commerce, Pune |
| 05.45 PM TO 06.00 PM | Question & Answers | Participants |

**Day Second – 03rd May 2020**


| Time | Topic | Resource Person |
|---|---|---|
| 03.50 PM TO 04.00 PM | Test Call & Check Connectivity | |
| 04.00 PM TO 04.45 PM | Preparing College Libraries for NAAC Beyond Metrics 4.2 | **Dr. Sachin J. Shastri** Librarian V. K. Krishna Menon College, Bhandup (East) |
| 04.45 PM TO 05.00 PM | Question & Answers | Participants |
| 05.00 PM TO 05.40 PM | Librarians Planning to Face NAAC Committee | **Dr. K. N. Wadje** Librarian Yeshwant Mahavidyalaya, Nanded |
| 05.40 PM TO 05.50 PM | Question & Answers | Participants |
| 05.50 PM TO 06.00 PM | Valedictory Session | Chief Guest **Mr. Ranjeet Dharmapurikar** Information Scientist SRTM University, Nanded |


| Coordinator | Chairperson of the Technical Sessions | Technical Coordinator | Technical Assistance |
|---|---|---|---|
| **Dr. Mrs. Medha R. Dharmapurikar** Librarian K.R.M. Mahila Mahavidyalaya, Nanded | **Dr. Govind K. Hambarde** Librarian MGMs College of Engineering, Nanded | **Mr. Chetan Taksale** Director Softech Solutions & Services, Pune | **Dr. Arun Hambarde** Jr. Lib. Asstt. SRTMU Nanded |

# Faculty Members invited as Resource Person





# *Modern Achievements*

***Priyanka Tikole,*** student of XI D student awarded first prize in online ***One Act Play competition*** proud to be her class Advisor

-Prof. Manisha Mandhare
Junior College



उपक्रम ▶▶ सर्वधर्मिय फुले, शाहू, आंबेडकर जयंती महोत्सव ▶▶ स्पर्धकांचा राज्यभरातून प्रतिसाद

## राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य लेखन, वक्तृव, चित्रकला स्पर्धेचा निकाल घोषित

**परभणी** ■ शहर प्रतिनिधी

कोरोना या रोगाचे गांभिर्य लक्षात घेऊन या वर्षी सर्वधर्मीय फुले शाहू आंबेडकर जयंती महोत्सव समितीने क्रांतिबा ज्योतिबा फुले आणि संविधानकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती निमित्त सोशल मिडीयाचा वापर करत राज्यस्तरीय ऑनलाईन स्पर्धा घेण्यात आल्या. विविध स्पर्धांना राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून बुधवार २७ मे रोजी या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

ऑनलाईन काव्य लेखन स्पर्धेत

खुल्या गटातून प्रथम : चाफेश्वर गांगवे (रिसोड), द्वितीय : दत्ता शेळके (रिसोड) , तृतीय : अभिजित पाटणे (गडहिंग्लज), उत्तेजनार्थ : आनंद देवगडे (यवतमाळ), प्रकाश बनसोडे (केज), तर शालेय गटात प्रथम मंदार लटपटे (गंगाखेड), द्वितीय शाश्वती मकरंद (परभणी), तृतीय वेदि[illegible] शिंदे (नांदेड), उत्तेजनार्थ प्रद्यु[illegible] भारती (नांदेड), ऋतुजा रोकडे या[illegible] समावेश आहे.

ऑनलाईन वक्तृत्व स्प[illegible] महाविद्यालयीन गटात प्रथम : जागृ[illegible] धलपे (ठाणे), द्वितीय : सुरज म्हशेळकर (कल्याण) तृतीय : प्रियंका भांड (दौंड), तृतीय : कुणाल बेदरे (गंगाखेड), उत्तेजनार्थ : खुशी सातोनकर, परभणी निशीगंधा मगरे (परभणी) यांचा समावेश आहे. गीत गायन स्पर्धेत प्रथम : रवीराज भद्रे (मुखेड), द्वितीय : विनायक बोकेफोडे (बार्शी), तृतीय : विकास कौठेकर (नांदेड), उत्तेजनार्थ : रेखाताई मनाठकर (नांदेड), मौजीज खान (परभणी), स्नेहा राऊत (अमरावती) तर प्रांजल बोधक (परभणी) [illegible] विशेष प्रोत्साहनपर बक्षीस मिळाले.

ऑनलाईन एकपात्री अभिनय स्पर्धेत प्रथम : प्रियंका टेकाळे, फॅन्सी ड्रेस स्पर्धेत प्रथम कोमल दिपके (हिंगोली), रांगोळी [illegible] वहालकर (रत्नागिरी), निबंध स्पर्धेत शालेय गटातून प्रथम वैष्णवी पारसे (सातारा), खुल्या गटात प्रथम : जयश्री बोरसे (धुळे) यांचा समावेश आहे.

या ऑनलाईन विविध स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अंजली धुतमल, अरविंद सगर, यशवंत मकरंद, सुभाष ढगे, सुरेश हिवाळे, डॉ. सुरेश शेळके, कॉ. अशोक उफाडे, अॅड. अफजल बेग, प्राचार्य डॉ. विठ्ठल घुले, त्र्यंबक वडसकर, प्रेमानंद बनसोडे, सुनील ढवळे, किशोर कटारे, सिताराम ठाकरे, प्रा. विलास गो[illegible]ळे, ज्योती बगाटे, डॉ. वर्षा [illegible]रेकर, त्रिवेणी पाटील, विशाल डा[illegible] विठ्ठल शिंदे, लक्ष्मी लहाने, नामदेव ल[illegible], सुभाष जोगदंड, संजीव अढागळे, स[illegible] रोडे आदींनी काम पाहिले.

हे वर्ष लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे शताब्दी वर्ष आहे. त्यामुळे १ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहेत अशी माहिती समितीचे निमंत्रक यशवंत मकरंद, प्रा. डॉ. सुरेश शेळके, सुरेश हिवाळे, प्राचार्य प्रल्हाद मोरे, डॉ. सुनिल जाधव, भीमराव वायवळ यांनी दिली आहे.

ePaper देशोन्नती
Fri, 29 May 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/52332871




Image Courtesy: Google Images

# *Modern Achievements*

Our student ***Mr. Saurabh Ramdas Pawar, TYB.Com*** received recognition for providing peerless services during COVID-19 Pandemic from **Wildlife Conservation Societies, Maharashtra State.**








Image Courtesy: Google Images

# Modern Achievements

***Nikita Bahirat,*** student of FYBSc has won the ***Indian Youth Congress National Level Speech Competition***. Topic of the speech was ‘***Unemployment and Economic Slowdown.’***
















Image Courtesy: Google Images

# News Paper Clippings During April 2020




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. From July 2019- September 2019 Issue of *MODLIB Bulletin* has introduced E-newspaper Clippings Service through which it will have a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Contribution of Institutions towards the Society, Health, Research, Sports, Miscellaneous .***

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

AL EXCLUSIVE पुणे शहर पुणे, शनिवार, २ मे २०२० ३

# पुणे विद्यापीठाचा अभ्यासक्रम ऑनलाइन

## कुलगुरूंचे निर्देश; ४० टक्के 'ई लर्निंग'वर भर

**पुणे, ता. १ : 'कोरोना'च्या संकटावर मात करून शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कंबर कसली आहे. पदवी व पदव्युत्तरचा किमान ४० टक्के अभ्यासक्रम 'ई लर्निंग' झाला पाहिजे, यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिले.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जुलै महिन्यात परीक्षा आणि सप्टेंबरपासून नवीन वर्षाचे वर्ग सुरू करण्यासाठी नियमावली जाहीर केली. त्यानंतर कुलगुरू करमळकर यांनी गुरूवारी ऑनलाइन अभ्यासक्रमचे आदेश काढले. प्रत्येक अभ्यासक्रमाची विद्यापीठाच्या नियमानुसार रचना करावी.

सामाजिक अंतर या नियमांमुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती हा महत्त्वाचा मुद्दा रहाणार आहे. विद्यार्थ्यांना घरातून शिकता यावे, त्यादृष्टीने अभ्यासक्रम आवश्यक आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम किमान 40 टक्के ऑनलाइन शिकवता येईल, यासाठी तयारी करावी. ऑनलाइन साहित्य निर्मितीसाठी प्राध्यापकांना सहभागी व्हावे लागणार आहे. राष्ट्रीय पातळीवर 'स्वयं', 'इ-पाठशाळा' अशा ॲपवर मोठ्या प्रमाणात इ कंटेन्ट उपलब्ध आहे. तसेल जागतिक पातळीवरही अनेक ठिकाणी पदवी, पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असेल असे साहित्य आहे. हे साहित्य संकलीत करावे, त्यानंतर ते विद्यापीठाकडून प्रमाणित करून घेतले जाणार आहे.

### समन्वयकपदी डॉ. अपर्णा राजेंद्र

ऑनलाइन कंटेन्ट निर्मितीसाठी पुणे विद्यापीठातील 'इएमएमआरसी', 'इ कंटेन्ट डेव्हलपमेंट स्टुडिओ' यासारख्या सुविधा आणि पायाभूत सुविधांचा वापर केला जावा. यासाठी प्रत्येक विद्याशाखेचे अधिष्ठातांना लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या आहेत. समन्वयक म्हणून जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. अपर्णा राजेंद्र यांच्याकडे जबाबदारी दिली आहे. पुढील काही महिन्यात अभ्यासक्रम अद्ययावत करणे, ऑनलाइनसाठी बदल करणे हे काम करताना व सुविधा, आवश्यक संदर्भ देणे, इ कंटेन्ट स्टोअर करणे अशी कामे या माध्यमातून होणार आहेत.



# ऑनलाइन शिक्षण देताय, तर..!

### टीव्ही, रेडिओचाही विचार होणे आवश्यक

**पुणे, ता. १ :** कोरोनामुळे ऑनलाइन शिक्षणाला महत्त्व प्राप्त होत असताना ॲक्टीव्ह टीचर्स फोरम(एटीएफ) या शिक्षक गटाने राज्यातील १ हजार १८६ शाळांमधील १ लाख ६७ हजार विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले. त्यात ४५ टक्के मुलांच्या पालकांकडे स्मार्ट फोन आहे. तर, २७ टक्क्यांकडे इंटरनेट आहे. त्यामुळे कोरोनानंतर घरातून ऑनलाइन शिक्षण देण्याबरोबरच टीव्ही, रेडिओ यांसह इतर माध्यमांचाही विचार करणे गरजेचे आहे, असे आवाहन 'एटीएफ'ने केले आहे.

कोरोना आपत्तीच्या पार्श्वभूमीवर देशभरात मुलांनाऑनलाइन शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू आहे. शालेय मुलांपैकी राज्यातील किती मुलांना ऑनलाइन अभ्यास करणे शक्य आहे, जूननंतर शाळा सुरू झाल्या नाहीत तर काय होईल, या विचाराने 'एटीएफ'ने सर्वेक्षण केले.

राज्यात एकूण १ लाख ९ हजार शाळा आहेत. त्यापैकी ६६ हजार शाळा जिल्हा परिषदेच्या आहेत. या सर्वेक्षणात

### 'एटीएफ'च्या सर्वेक्षणातील निष्कर्ष

राज्यातील सर्व प्रकारच्या १ हजार १८६ शाळांमधील १ लाख ६७ हजार ६८७ मुलांची माहिती संकलीत करण्यात आली. यात जिल्हा परिषदेच्या १ हजार ५४ शाळा आहेत. या शाळांमधील ९७ हजार ७९४ मुलांपैकी ५२ हजार ५५८ मुलांच्या घरी टिव्ही आहे. तर ३ हजार ४६९ मुलांकडे लॅपटॉप, संगणक आहे. ६८ हजार ५० विद्यार्थ्यांच्या पालकांकडे साधे फोन आहेत, तर ३६ हजार ३०० पालकांकडे स्मार्ट फोन आहेत. तर २० हजार ४२२ पालकांकडे इंटरनेट आहे.

महापालिका, नगरपालिकेच्या २१ शाळांमध्ये शाळांमधील ४ हजार २८० पैकी एक हजार ३७६ पालकांकडे स्मार्ट फोन असले तरी ६११ म्हणजे केवळ १४ टक्के स्मार्ट फोनला इंटरनेटची जोडणी आहे. खासगी अनुदानित शाळांमधल्या ४३ हजार ३१२ मुलांपैकी २२ हजार ८६० पालकांकडे स्मार्ट फोन असून, ३५ टक्के स्मार्ट फोनला इंटरनेटची जोडणी आहे. खासगी विनाअनुदानित शाळांमधल्या २२ हजार ३०१ पैकी ९ हजार ३८५ म्हणजे ४२ टक्के पालकांकडे स्मार्ट फोनला इंटरनेटची जोडणी आहे, ही संख्या सर्वाधिक आहे. या एकुण १ लाख ६७ हजार विद्यार्थ्यांपैकी ८१ टक्के जणांच्या घरी टीव्ही आहे, असे या सर्वेक्षणात समोर आले आहे.

**ऑनलाइन शिक्षणाला महत्त्व येत असताना किती पालकांकडे स्मार्ट फोन व इंटरनेट आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. यात ऑनलाइन शिक्षणापासून विद्यार्थी वंचित आहेत. लॉकडाउननंतर टिव्ही किंवा रेडिओ या माध्यामातूनही चांगले शिक्षण देता येऊ शकेल. याचा विचार करणे आवश्यक आहे.**
**– भाऊसाहेब चासकर,** संयोजक, 'एटीएफ'

**राज्यातील विद्यार्थ्यांच्या बहुतांश पालकांकडे ॲन्ड्राइड मोबाइल आहेत. काही भागांतील पालकांकडे हे मोबाइल नाहीत. त्यांची मुले देखील शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शिक्षण विभाग 'डीटीएच' वाहिनी सुरू करीत आहे.**
**– दिनकर पाटील,** शिक्षण संचालक

**Sakal: 1.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

**Section : Education**

## पुणे विद्यापीठाचा किमान ४० टक्के अभ्यासक्रम 'ई लर्निंग'करा

### कुलगुरू डॉ. करमळकर यांच्या प्राध्यापकांना सूचना

**पुणे :** शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे काम सुरु आहे. विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तचा किमान ४० टक्के अभ्यासक्रम 'ई लर्निंग' झाला पाहिजे, यासाठी प्राध्यापकांनी यात जास्तीत जास्त प्रयत्न करावेत, असे निर्देश कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिले आहेत.

विद्यापीठ अनुदान मंडळाने (यूजीसी) जुलै महिन्यात परीक्षा आणि सप्टेंबरपासून नवीन वर्षाचे वर्ग सुरू करण्यासाठी नियमावली जाहीर केली आहे. त्यानंतर पुणे विद्यापीठ ही त्यासाठी कामाला लागले आहे. कुलगुरू करमळकर यांनी यासंदर्भात कार्यालयीन आदेश काढले आहते. प्रत्येक अभ्यासक्रमात प्राधान्याने सुधारणा करून तो विद्यापीठाच्या नियमानुसार त्याची रचना करावी. 'सोशल डिस्टंन्सींग'च्या नियमांमुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती हा महत्त्वाचा मुद्दा या वर्षात रहाणार आहे. विद्यार्थ्यांना घरातून शिकता यावे यासाठी त्यादृष्टीने अभ्यासक्रम आवश्यक आहे. विद्यापीठात शिकवला जाणारा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम किमान ४० टक्के ऑनलाईन शिकवता येईल यासाठी तयारी करावी. यासाठी प्राध्यापकांना ऑनलाईन साहित्य निर्मितीसाठी जास्तीत जास्त या कामात सहभागी व्हावे लागणार आहे.

राष्ट्रीय पातळीवर 'स्वयं', 'इ-पाठशाळा' अशा ॲपवर मोठ्या प्रमाणात इ कंटेन्ट उपलब्ध आहे. तसेल जागतीक पातळीवर ही अनेक ठिकाणी पदवी, पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असेल असे साहित्य आहे. हे साहित्य संकलीत करावे, त्यानंतर त्यास विद्यापीठाकडून प्रमाणित करून घेतले जाणार आहे.

**Kesari: 3.5.2020**

## ४० टक्के अभ्यासक्रम यापुढे ऑनलाइनच

**प्रभात वृत्तसेवा**



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय**

**पुणे, दि. २ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२०-२१) प्रत्येक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा चाळीस टक्के अभ्यासक्रम हा ई- लर्निंगच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहेत. तसेच, करोना आणि लॉकडाऊच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन अभ्यासक्रमाचा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणीही करण्याचे निर्देश कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिले आहेत.

यासोबतच येत्या शैक्षणिक वर्षापासून स्वयम'च्या ऑनलाइन अभ्यासक्रमांचा अधिकाधिक वापर करण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. विद्यापीठात असणाऱ्या अभ्यासक्रमांची पुन्हा एकदा पडताळणी करून , त्यामध्ये विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत असा इ-कंटेंट समाविष्ट करण्याच्या सूचना डॉ. करमळकर यांनी दिल्या आहेत. स्वयम' प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार २० टक्के क्रेडिट पॉइंट्स मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना प्राचार्य आणि प्राध्यापकांना केल्या आहेत. ई-लर्निंग प्लॅटफॉर्मसाठी लागणाऱ्या ई-कंटेंटसाठी राष्ट्रीय स्तरावरील ई-पाठशाला, स्वयम' यांसारख्या सुविधा असणाऱ्या जागतिक स्तरावरील प्लॅटफॉर्मचा वापर करावा. यासोबतच विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणाऱ्या इएमआरसी, ई-कंटेंट स्टुडिओचा वापर करावा अशा सूचना देण्यात आल्या देण्यात आल्या आहेत. विद्यार्थी आणि प्राध्यापकांना या ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा अधिकाधिक उपयोग होण्यासाठी जयकर नॉलेज रिसोर्स सेंटरच्या संचालकांनी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करायच्या आहेत. त्यासोबतच विद्यापीठाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी चारही विद्याशाखांच्या अधिष्ठातांनी आवश्यक त्या सूचना देण्याची कार्यवाही करावी, असे आदेश डॉ. करमळकर यांनी दिले आहेत आहेत. ई-कंटेंट निर्मिती, ई-लर्निंग प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना विद्यापीठांच्या अधिष्ठातांना देण्यात आल्या आहेत. आगामी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी संपूर्ण उपाययोजना राबवायच्या आहेत, अशा स्पष्ट सूचना डॉ. करमळकर यांनी दिल्या.

प्रभात Sun, 03 May 2020
epaper.eprabhat.net/c/51545185

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

लोकमत

### राज्य सरकारची समिति करणार कुलगुरूंशी चर्चा

महाविद्यालयीन परीक्षेतील एकवाक्यताबाबत संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात याबाबतचा अहवाल देण्यासाठी राज्य शासनातर्फे स्थापन करण्यात आलेल्या समितीतील सदस्य आता राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंशी चर्चा करणार आहेत. त्यानंतरच समितीचा अहवाल राज्य शासनाला सादर केला जाणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. त्यामुळे राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात, याचा अभ्यास करून अहवाल देण्यासाठी राज्यपाल व उच्च शिक्षणमंत्र्यांच्या सूचनेनुसार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरु शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कुलगुरु देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समितीचे स्थापन करण्यात आली.

राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयांच्या परीक्षा घेण्यात एकवाक्यता आणण्याच्या दृष्टीने कुलगुरुंशी चर्चा करणे योग्य ठरेल. त्यामुळे समितीतील प्रत्येक सदस्याने दोन किंवा तीन कुलगुरुंशी चर्चा करावी, असे या बैठकीत निश्चित झाले. त्यानुसार समितीतील सर्व सदस्य कुलगुरुंशी चर्चा करुन अहवाल राज्य शासनाला सादर करणार आहेत. त्यानंतरच राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षा कोणत्या पद्धतीने होणार, याबाबत स्पष्टता येणार आहे, असे सूत्रांनी सांगितले.

#### अहवाल तयार करण्यात येणार

विद्यापीठ अनुदान आयोगानेसुद्धा शैक्षणिक वेळापत्रक तयार करण्यासाठी व परीक्षांबाबत निर्देश देण्यासाठी समितीची स्थापना केली होती. त्यामुळे यूजीसीकडून निर्देश प्राप्त झाल्यानंतरच राज्याच्या समितीने काम करण्याचा निर्णय घेतला. दोन दिवसांपूर्वी केंद्र शासन व यूजीसीकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार १ मे रोजी राज्य शासनाने स्थापन केलेल्या समितीची बैठक घेण्यात आली. त्यात राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंनी संवाद साधून अहवाल तयार करण्याचा निर्णय झाला.

Pune Main
Page No. 2 May 03, 2020
Powered by: erelego.com

### विद्यापीठ परीक्षांबाबत चार दिवसांत अहवाल

पुणे, ता. ३ : राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या परीक्षा कशा पद्धतीने घ्यायच्या यासंदर्भात राज्य सरकारने नेमलेल्या समितीचा अहवाल पुढील तीन ते चार दिवसात राज्य सरकारला सादर केला जाईल, असे समितीचे अध्यक्ष व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांनी स्पष्ट केले आहे.

तेरा अकृषी विद्यापीठांमध्ये परीक्षा कोणत्या स्वरूपात घ्यावी याचे धोरण निश्चित करण्यासाठी समिती अहवाल देणार होती. विद्यापीठ अनुदान आयोगाची नियमावली जाहीर होण्यापूर्वी अहवाल सादर केल्यास राज्य व 'यूजीसी' यांच्यात विरोधाभास निर्माण झाल्यास गोंधळ होऊ शकतो, त्यामुळे हा अहवाल सादर करण्यात आला नव्हता. दरम्यान २९ एप्रिल रोजी यूजीसीने परीक्षा आणि नवीन शैक्षणिक वर्षाचे वेळपत्रक यासंदर्भात नियमावली जाहीर केली आहे. यात १ जुलैपासून परीक्षा घ्याव्यात, तसेच स्थानिक परस्थिती पाहून निर्णय घ्यावेत असेही स्पष्ट केले आहे. आता राज्यातील समितीही अहवाल सादर करणार आहे. कुलगुरू सुहास पेडणेकर म्हणाले, "सरकारने नेमलेल्या समितीचा अहवाल अद्याप अंतिम झालेला नाही. तीन चार दिवसात आम्ही अहवाल सादर करू."

**Sakal: 4.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

Sakal: 5.5.2020

# शिक्षकांना वेठीस धरू नका

## नववी, अकरावी निकालावरून तावडे यांची सरकारवर टीका

**पुणे, ता. ४ :** नववी आणि अकरावीचे निकाल तयार करण्याची घाई कशासाठी? लॉकडाउनच्या काळात, हे शक्य आहे का? सरकारने अशा कामांसाठी शिक्षकांना त्रास देऊन वेठीस धरू नये, असे मत माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी केले.

लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर तावडे यांनी झुम ॲपवर पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. दहावी, बारावीच्या निकालाच्या कामाचा समावेश अत्यावश्यक सेवेमध्ये करावा, अशी मागणी त्यांनी केली. या दोन्ही परीक्षांचे पेपर लवकर तपासून झाले, तरच निकाल वेळेवर लागतील. त्यामुळे या कामासाठी विशेष परवानगी शिक्षण विभागाने काढून घ्यावी, असे ते म्हणाले.

दहावीच्या रद्द केलेल्या भूगोलाच्या पेपरचे गुणांकन कसे होणार, त्यानंतर अकरावीचे प्रवेश कसे होणार, याचे धोरण सरकारने जाहीर करावे, असे तावडे म्हणाले. जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण मोबाइलच्या माध्यमातून शक्य नाही, त्यासाठी दूरचित्रवाहिनी सुरू करावी. शिक्षण संचालकांना नववी आणि अकरावीचे गुण विद्यार्थ्यांना एसएमएस वा डिजिटल माध्यमातून कळविण्यास सांगितले आहे. लॉकडाउनमध्ये सर्व विषयांचे पेपर तपासणे व गुणपत्रिका विद्यार्थ्यांना पाठविणे शक्य नाही, असे त्यांनी नमूद केले. उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन असतो, त्यांना ऑनलाइन शिक्षण देणे शक्य आहे. त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा. मूक्ससारखे (मॅसिव्ह ऑनलाइन ओपन कोर्स) अभ्यासक्रम चालवावे लागतील, त्याची तयारी विद्यापीठांनी केली पाहिजे, असे तावडे म्हणाले.

### अभ्यास कमी करावा लागणार : तावडे

कोरोनामुळे पुढील शैक्षणिक वर्ष हे छोटे सहा-सात महिन्यांचे असणार आहे. त्यामुळे कोणत्या विषयांचा अभ्यासक्रम कमी करायचा याचा निर्णय तज्ज्ञांना घ्यावा लागेल, त्यासाठी शिक्षण विभागाने पावले उचलावीत. पुरेसे शिक्षक उपलब्ध करावेत, अशी मागणी तावडे यांनी केली.

# Pune academicians welcome UGC ban on self-plagiarism

**PRANITA ROY**
@PranitaRoy

**PUNE:** Experts have stated that the recent decision taken on 'self-plagiarism' by the University Grants Commission (UGC) is 'very timely and required.'

**SELF-PLAGIARISM IN RESEARCH**

The UGC recently added a new clause in its UGC (Promotion of Academic Integrity and Prevention of Plagiarism in Higher Educational Institutions) Regulations, 2018, which strictly objects the practice of self-plagiarism or text-recycling.

The commission stated in its notice issued on April 20 that 'reproduction, in part or whole, of one's own previously, published work without adequate citation and proper acknowledgement and claiming the most recent work as new and original for any academic advantage amounts to 'text-recycling' (also known as 'self-plagiarism') and is unacceptable'.

The academicians have stated that such practices have been largely seen in several institutions. Hence, the University Grants Commission has rightly brought in a policy in this regard.

It not only affects the productivity of a person but also the credibility of the research, stated experts.

### 'RARE WORKS CAN BE EXEMPTED'




SPPU's UGC Consortium for Academic and Research Ethics (CARE) coordinator Shubhada Nargarkar said that self-plagiarism can be allowed if someone is working on rarest research which only that particular person is carrying out.

### Hampering academic quality

"There are a few professors who worked on the same research topic and published three or four research papers. They leverage upon their one research work done once upon a time. The right way is one publication means one research," said SPPU Department of Education and Extension Head Sanjeev Sonawane.

"But I noticed that UGC hasn't mentioned about any mechanism to identify the self-plagiarised texts. The plagiarism software doesn't identify if the author hasn't cited or referred to the original link of the article," he added.

Sakaal Times: 5.5.2020


# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

नवभारत

### प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे ने जताया विश्वास

# आने वाला समय शिक्षा संस्थानों के लिए बेहतरीन अवसर



सुधीर देशमुख

**पुणे.** पूरे विश्व में कोरोना महामारी के चलते अब तक ढाई लाख लोगों की मौत हो चुकी और करीब 30 लाख से अधिक लोग इसकी चपेट में है. इसका काफी गहरा असर वैश्विक शिक्षा तंत्र पर हुआ है. अगर आने वाले समय में सरकार और विश्वविद्यालय शिक्षा संस्थानों को थोड़ी स्वायत्ता दें तो शिक्षा संस्थान काफी प्रगति कर सकते है. आने वाला समय वाकई में शिक्षा संस्थानों के सामने एक बेहतरीन अवसर है, ऐसा मंतव्य प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे ने दिया.इस समय कोरोना वाइरस के संक्रमण और लॉक डाउन के चलते शिक्षा तंत्र पर हुए असर के संदर्भ में डॉ. गजानन एकबोटे ने नवभारत से बातचित करते हुए उन्होंने शैक्षणिक घटनाक्रम पर खुलकर अपना मत व्यक्त किया.

## देश में ही पढ़ाई को तरजीह देंगे छात्र

डॉ. एकबोटे ने कहा कि, कोरोना की वैश्विक महामारी का असर अमरीका और यूरोप के देशों में भारत से कहीं अधिक दिखाई दे रहा है. इस स्थिति को देखते हुए प्रतिवर्ष भारत से विदेश जाने वाले छात्र हजारों छात्र अब भारत में ही पढ़ाई को तरजीह देंगे. जिससे भारत के शिक्षा संस्थानों को छात्र बड़ी संख्या में उपलब्ध होंगे. ऐसी स्थिति में शिक्षा संस्थानों के सामने अपने आप को उच्च कोटी का संस्थान साबित करना का अच्छा अवसर होगा. इसका फायदा इन शिक्षा संस्थानों को उठाना होगा.

## अगस्त में शुरू होगा शैक्षणिक सत्र

कोरोना के चलते उपजी स्थिति के बाद अब आगामी शिक्षा की स्थिति और परीक्षाओं के संदर्भ में डॉ. एकबोटे ने बताया कि, इस वर्ष शैक्षणिक सत्र काफी देर से शुरू होगा. जुलाई के महीने में परीक्षाएं होगी. नीट और इंजीनियरिंग की परीक्षाएं 26 जुलाई को होने की घोषणा की गई है. कुछ परीक्षाएं अगस्त में होंगी. प्राथमिक और माध्यमिक शालाओं का शैक्षणिक सत्र अगस्त महीने से जबकि उच्च शिक्षा का सत्र सितंबर से शुरू होगा. इस वर्ष छुट्टियां काफी कम मिलने की संभावना है.

## शिक्षा संस्थानों को मिलें स्वतंत्रता

आज राज्य में मौजूद शिक्षा संस्थान समाज के सभी तबकों तक शिक्षा को पहुंचाने का काम कर रहे है. लेकिन सरकार तथा विश्वविद्यालयों की ओर से उन पर काफी सारी पाबंदिया हैं, कोरोना वाइरस के चलते शिक्षा क्षेत्र के सामने काफी सारी चुनौतियां उत्पन्न की है. ऐसे में सरकार और विश्वविद्यालय शिक्षा संस्थानों को और ज्यादा छूट या स्वतंत्रता दें तथा शिक्षा का विकेंद्रिकरण करने की ओर ज्यादा प्रयास करें. इससे शिक्षा का दायरा और भी व्यापक होगा, जोकि छात्रों के लिए काफी लाभदायक रहेगा.

**पीईएस ने अब तक पूरा किया 90 प्रतिशत पाठ्यक्रम**

कोरोना वाइरस के चलते लॉकडाउन में छात्रों का शैक्षणिक नुकसान ना हों, इसके लिए उचित नियोजन कर प्रोग्रेसिव एजुकेशन संस्थान के सभी कॉलेजों में ऑनलाइन एजुकेशन देकर पाठ्यक्रम को पूरा किया जा रहा है. जूम ऐप के माध्यम से प्राध्यापक सीधे छात्रों को पढ़ाने के लिए लेक्चर्स ले रहे है. इसीका नतीजा है कि, अब तक छात्रों का 90 प्रतिशत पाठ्यक्रम पूरा किया गया है. प्राथमिक और माध्यमिक शिक्षा विभाग में भी छात्रों को ऑनलाइन क्लासेस के माध्यम से पढ़ाया जा रहा है. कोरोना का संकट कोई दो-चार दिनों में खत्म होने वाला संकट नहीं है. हालांकि, अगर हम सोशल डिस्टन्सिंग का पालन करें और हमेशा मास्क पहनकर ही बाहर निकलें, बार-बार सैनिटाइजर या साबून से हाथ धोएं तो हम इस स्थिति में भी हमारी सामान्य जिंदगी जी सकते है. कोरोना को हमें हराने के लिए काफी समय लगेगा. इसलिए इस लम्बी लड़ाई की हमें तैयारी करनी होगी.

Navabharat Pune Edition
6 May, 2020 Page No. 3

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

लोकमत

# विद्यापीठांतील पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या आता परीक्षा नाहीत

## आधीच्या परीक्षेच्या गुणांच्या आधारे मूल्यांकन

एस. के. गुप्ता ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील ८०० विद्यापीठांत थांबलेल्या परीक्षा आणि विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठांना त्यांनी कोविड-१९ टीम स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण असेल तर ते कोविड-१९ टीमला ती सांगू शकतील.

सोशल मिडियावरील संवादात केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी पुणे येथील विद्यार्थी जय मिश्र याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, "विद्यापीठांमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या राहिलेल्या विषयाच्या परीक्षा आता घेतल्या जाणार नाहीत. विद्यार्थ्यांना दिलेली कामे (असाईनमेंटस) आणि प्रकल्प अहवालाच्या आधारावर ५० टक्के गुण दिले जातील व ५० टक्के गुणांचे मूल्यांकन त्यांच्या आधी झालेल्या परीक्षांच्या आधारे करून पुढील वर्गात त्यांना प्रवेश दिला जाईल.

### नवे शैक्षणिक कॅलेंडर

- प्रवेश प्रक्रिया एक ते 30 ऑगस्ट २०२०
- वर्गाची सुरवात : द्वितीय व तृतीय वर्षासाठी १ ऑगस्टपासून व नवीन तुकड्या १ सप्टेंबर २०२० पासून.
- परीक्षा : १ ते २५ जानेवारी २०२१
- वर्गांचा प्रारंभ : २७ जानेवारी २०२१ पासून
- वर्ग समाप्ती : २५ जून, २०२१
- उन्हाळ्याच्या सुट्या : १ ते 30 जुलै, २०२१
- पुढील सत्र : २ ऑगस्ट, २०२१ पासून

Pune Main
Page No. 8 May 06, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# अभ्यासक्रम निश्चितीसाठी केवळ तीन दिवस

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आदेशामुळे सदस्यांपुढे प्रश्न

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रम सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत द्वितीय वर्ष पदवी आणि द्वितीय वर्ष पदव्युत्तर पदवीचा बदललेला अभ्यासक्रम सादर करण्यासाठी ९ मेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. मात्र, टाळेबंदीमुळे महाविद्यालये, ग्रंथालये बंद असताना अभ्यासक्रम निश्चित करायचा कसा, असा अभ्यास मंडळातील काही सदस्यांपुढे प्रश्न आहे.

विद्यापीठाने गेल्या वर्षीपासून श्रेयांक गुण पद्धती (चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टिम) लागू केली. त्यानुसार अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या वर्षी प्रथम वर्ष पदवी आणि प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात बदल करण्यात आला. तर यंदा द्वितीय वर्ष पदवी आणि द्वितीय वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम बदलण्यात येणार आहे. त्याची प्रक्रिया यापूर्वीच सुरू करण्यात आली. मात्र, टाळेबंदी लागू असताना आता अभ्यासक्रम सादर करण्याची सूचना विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडून ६ मे रोजी परिपत्रकाद्वारे देण्यात आली. त्यात अभ्यासक्रम सादर करण्यासाठी ९ मे, अभ्यासक्रमांना अभ्यास मंडळांकडून मान्यतेसाठी १२ मे, संबंधित विभागांकडून मान्यतेसाठी १६ मे, शैक्षणिक परिषदेकडून मान्यतेसाठी २३ मे, अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी ३० मे, बदललेल्या अभ्यासक्रमानुसार प्राध्यापकांचे प्रशिक्षण १५ जून अशी मुदत ठरवण्यात आली आहे.

गेला दीड महिना टाळेबंदी आहे. अभ्यासक्रम तयार करण्यासाठीचे संदर्भ ग्रंथ, पुस्तके आदी साहित्य महाविद्यालयात, ग्रंथालयात असल्याने साहित्य उपलब्ध झालेले नाही. अभ्यासक्रम तयार करणे ही मोठी प्रक्रिया आहे.

> **कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी एप्रिलमध्ये अभ्यास मंडळांच्या बैठका ऑनलाइन पद्धतीने घेतल्या. तसेच अभ्यासक्रम निर्मितीबाबत अनेकदा आढावाही घेण्यात आला. सर्वच अभ्यास मंडळांनी अभ्यासक्रम तयार केला आहे. आता २३ मे रोजी विद्या परिषदेची ऑनलाइन बैठक होणार आहे.**
>
> **- डॉ. एन. एस. उमराणी,**
> प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Loksatta Pune: 8.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# पदवी परीक्षा होणारच

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

- शेवटच्या सत्राच्या विद्यार्थ्यांबाबत निर्णय
- इतर सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश
- पूर्व कामगिरीवर मूल्यांकन होणार

देशात करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या लॉकडाउनमुळे विद्यापीठांच्या परीक्षा रखडल्या होत्या. यावर उलट-सुटल चर्चा सुरू असतानाच शुक्रवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश देण्याचा मार्ग मोकळा केला आहे. मात्र या विद्यार्थ्यांचे पूर्व कामगिरीवर ५०:५० सूत्राच्या आधारे मूल्यांकन होईल, असे त्यांनी स्पष्ट



केले. तर तृतीय वर्षाची, तसेच पदवीच्या शेवटच्या सत्राची परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशानुसार जुलै महिन्यात पार पडेल, असेही स्पष्ट केले. याचे वेळापत्रक विद्यापीठ

➤ वृत्त...८

### परीक्षा आणि मूल्यांकन कसे?

- तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात सहाव्या सत्राची, चार वर्षांच्या अभ्यासक्रमातील केवळ आठव्या सत्राची, पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची फक्त दहाव्या सत्राची तर दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या केवळ चौथ्या सत्राची परीक्षा होईल.
- ज्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा वार्षिक होतात, त्यांच्या केवळ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल.
- विद्यार्थी शिकत असलेल्या वर्षातील किंवा सत्रातील अंतर्गत मूल्यमापनाचे ५० टक्के आणि आधीच्या सत्रातील किंवा वर्षातील गुण ५० टक्के असे ग्राह्य धरून मूल्यांकन करण्यात येईल.
- पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचे फक्त अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ग्राह्य धरून सरासरी काढण्यात येईल.
- अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या नसल्यास विद्यार्थ्यांचा प्रकल्प, प्रयोगवही यांच्याआधारे किंवा ऑनलाइन तोंडी परीक्षा घेऊन मूल्यांकन करण्यात येईल.
- टाळेबंदीच्या कालावधीत विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहित धरण्यात येईल.
- उन्हाळी सुट्टीबाबत विद्यापीठ त्यांच्या स्तरावर निर्णय घेईल.


# पदवी परीक्षा होणारच




पान १वरून

त्यांच्या स्तरावर जाहीर करेल.

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वेळापत्रकाबाबत सरकारने कुलगुरू आणि अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. या समितीने गुरुवारी आपला अहवाल सरकारकडे सादर केला. या अहवालाचे अवलोकन करून सामंत यांनी शुक्रवारी फेसबुकवरून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना हा निर्णय जाहीर केला आहे. 'राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील अंतिम वर्षाच्या किंवा सत्र पद्धत असल्यास अंतिम सत्राच्या परीक्षा होतील बाकी सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. परीक्षा न होणाऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांची आतापर्यंतची कामगिरी लक्षात घेऊन त्यांचे निकाल जाहीर करण्यात येणार आहेत. अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पुढील वर्गात प्रवेश दिला जाईल. मात्र त्यांना पुढील परीक्षेमध्ये राहिलेल्या सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. निकालात सुधारणा करायची असल्यास किंवा कमी गुण मिळाल्यासही विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेची संधी देण्यात येणार असून ही परीक्षा ऐच्छिक असले. विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन जुलैमध्ये करून १५ ऑगस्टपर्यंत निकाल जाहीर करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. मात्र गरज भासल्यास २० जून रोजी परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार निर्णयात बदल करण्यात येतील,' असेही सामंत यांनी सांगितले. ज्या विद्यार्थ्यांना एटीकेटी आहे अशा विद्यार्थ्यांनाही शेवटच्या वर्षात प्रवेश देण्यात येणार आहेत. मात्र त्यांना १२० दिवसांच्या मुदतीत विद्यापीठ ज्या परीक्षा घेईल, त्यात त्यांच्या विषयाची परीक्षा देऊन उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील, असे सांगण्यात आले आहे.

### सामायिक प्रवेश परीक्षा जुलै अखेरीस

राज्यातील तंत्रशिक्षण, विधि, शिक्षणशास्त्र यांसह विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा (सीईटी) प्रवेश नियमन प्राधिकरण घेते. या परीक्षा २३ ते ३१ जुलैदरम्यान घेण्याचे प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे. याचा आढावा घेण्यासाठी चार सदस्यीय समिती नेमण्यात आली असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर येत्या आठ दिवसांत याबाबतचा निर्णय जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती सामंत यांनी दिली.

**Maharashtra Times: 9.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

## परीक्षेशिवाय विद्यार्थी पास

### विद्यापीठात केवळ अंतिम वर्षाच्याच परीक्षा होणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ८** - पदवी आणि पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा वगळता कॉलेजच्या सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्याची घोषणा उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज केली. पदवी आणि पदव्युत्तरच्या केवळ अंतिम वर्षांचीच परीक्षा होणार असल्याचे उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

या निर्णयामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. बाकी सर्व वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचे सरासरी गुण काढून नवीन वर्गात प्रवेश मिळणार आहे. मात्र, नापास झालेले विषय पुढील परीक्षेत उत्तीर्ण होणं आवश्यक आहे. आधी कमी गुण मिळाले असतील तर ऐच्छिक परीक्षा देण्याचीही मुभा देण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्देशांनुसार सर्व निर्णय घेण्यात येत असल्याचंही सामंत यांनी स्पष्ट केलं. राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम परीक्षा १ ते ३१ जुलैदरम्यान होतील. **(पान २ पहा)** ▸▸

## परिक्षेशिवाय विद्यार्थी पास

मात्र, लॉकडाऊनची स्थिती कायम राहिल्यास २० जूनच्या आसपास बैठक घेऊन अंतिम निर्णय होईल, असे उदय सामंत यांनी सांगितल आहे. 'करोना'च्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाऊनमुळे शाळा-महाविद्यालय बंद आहेत. शालेय विद्यार्थ्यांना याआधीच पुढील वर्गात प्रवेश मिळाला आहे. मात्र कॉलेज विद्यार्थ्यांवर टांगती तलवार होती. बीए, बीकॉम हे तीन वर्षांच्या कालावधीचे अभ्यासक्रम आहेत. त्यात सहा सत्र असतात. या सहाव्या सेमिस्टरची परीक्षा फक्त होणार आहे. जिथे ८ सेमिस्टर आहेत, तिथे आठव्या, दहा सेमिस्टर असतील, तिथे दहाव्या सेमिस्टरची परीक्षा घेतली जाणार आहे. एमए, एमकॉम आणि दोन वर्षांचे जे अभ्यासक्रम आहेत, त्याला चार सेमिस्टर आहेत. तिथे चौथ्या सेमिस्टरची परीक्षा होणार आहे. डिप्लोमाचा कालावधी तीन वर्षांचा, म्हणजे सहा सेमिस्टरचा आहे. त्याच्या सहाव्या सेमिस्टरची परीक्षा होईल, असे सामंत यांनी स्पष्ट केले आहे.

**Prabhat: 9.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

### परीक्षेसाठी कृती आराखडा

**पुणे, ता. ८ :** राज्य सरकारने दिलेल्या निर्देशाप्रमाणे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्यानंतरच परीक्षा कशी हे स्पष्ट होणार आहे.

राज्य सरकारने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या परीक्षा संदर्भात शुक्रवारी (ता.८) धोरण स्पष्ट केले. यामध्ये केवळ अंतिम वर्षाच्या व अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार असल्याचे जाहीर केले. तर प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अंतर्गत मुल्यांकनावर आधारीत गुण देऊन उत्तीर्ण केले जाणार आहे. पुणे विद्यापीठाचे पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यात सुमारे साडेसात लाख विद्यार्थी दरवर्षी परीक्षा देतात. त्यापैकी किमान १ ते सव्वा लाख



विद्यार्थी अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. सोशल डिस्टन्सिंगचा विचार करून त्यांच्या परीक्षा विद्यापीठाला घ्यायच्या आहेत.

राज्य सरकारने निर्णय जाहीर केला असला तरी त्याचे परिपत्रक आल्यावर यासंदर्भात बैठका सुरू होतील. तसेच विद्यापीठ कायद्यानुसार योग्य निर्णय घेऊन नियोजन करावे लागेल. परीक्षा मंडळाच्या बैठकीत मान्यता घेतल्यावरच वेळपत्रक व परीक्षा कशा होणार हे जाहीर केले जाईल. यासाठी किमान तीन, चार दिवस लागतील, असे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी याबाबत निवेदन जाहीर केले आहे. "विद्यापीठांच्या परीक्षांबाबत ''यूजीसी'' आणि राज्य सरकारने केलेल्या घोषणेनुसार पुणे विद्यापीठाचे नियोजन सुरू आहे. परीक्षांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यासाठी, त्यांचा परीक्षांबाबत संभ्रम दूर करण्यासाठी तसेच, तणावाच्या या काळात विद्यार्थ्यांचे योग्य ते समुपदेशन करण्यासाठी जिल्हानिहाय व्यवस्था करण्यात येत आहे. पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात घ्यावयाच्या परीक्षांबाबत सविस्तर कृति आराखडा तयार करण्यात येत आहे.'' असे करमळकर यांनी सांगितले.

### अंतिम सत्राच्या परीक्षा होणार

**मुंबई, ता. ८ :** विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत, तर इतर वर्षातील विद्यार्थ्यांना मागील सत्रातील गुणांच्या आधारे पुढील वर्गात पाठवण्यात येणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी हा निर्णय जाहीर केला.

सामंत यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून राज्यातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली. यूजीसीच्या निर्देशांनुसारच अंतिम सत्राच्या परीक्षा घेतल्या जातील, असे सामंत यांनी स्पष्ट केले. १ ते ३० जुलैदरम्यान

पान २ वर »

### अंतिम सत्राच्या परीक्षा होणार

» पान १ वरून

अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याचे यूजीसीचे निर्देश आहेत. त्यानुसारच परीक्षा होतील. लॉकडाउन वाढल्यास २० ते २५ जूनच्या दरम्यान पुन्हा या सर्व मुद्द्यांवर चर्चा होईल असे ते म्हणाले. सध्या जे कोर्स सुरू आहेत, त्यामध्ये अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राचीच फक्त परीक्षा घेतली जाईल. त्याव्यतिरिक्त आधीच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागील वर्षाच्या आणि या वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेऊन श्रेणी पद्धतीने गुण देऊन पुढील वर्षात पाठवले जाणार आहे, अशी घोषणा त्यांनी केली.

राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आणि राज्य सरकारने मिळून विचारपूर्वक हा निर्णय घेतला आहे. सध्याचे कोरोनाचे संकट आणि लॉकडाउनचा कालावधी लक्षात घेता अंतिम वर्गातील अंतिम सत्राची परीक्षा सोडून इतर विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता आधीच्या गुणांच्या आधारावर पुढील वर्गात पाठवण्याचा निर्णय घेतला आहे, असे सामंत यांनी जाहीर केले.

या पद्धतीनुसार जर कुठल्या विद्यार्थ्याला वाटले की आपल्याला कमी गुण दिले गेले आहेत, तर त्याला पुढच्या वर्षात ती परीक्षा पुन्हा देण्याचादेखील पर्याय देण्यात आला आहे. श्रेणी पद्धतीमध्ये नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांनादेखील पुढच्या वर्षात दाखल केले जाईल.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी सीईटी परीक्षा घेण्याबाबत यंदा तालुका स्तरावर सीईटी परीक्षा घेण्याचा प्रयत्न असल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले.

परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात काही शंका असल्यास त्यावर मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठांनी दोन दिवसांत सेल सुरू करावा.

**स्वायत्त विद्यापीठांनाही लागू**

राज्यातील विद्यापीठाच्या परीक्षेबाबत घेतलेला निर्णय स्वायत्त विद्यापीठांनाही लागू असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले. या निर्णयानुसार स्वायत्त विद्यापीठांनी परीक्षा निश्चित कराव्यात.

**Sakal: 9.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# University exams only for final semester students

## Others To Be Promoted Sans Tests

Swati Shinde Gole
@timesgroup.com

### MOVE TO THE NEXT CLASS

➤ A 50:50 gradation formula will be used – 50% performance of previous semester and remaining 50% based on current semester

➤ Students who fail in this formula will also be promoted


➤ Students can also appear for class improvement if they are not satisfied with their grades

➤ The exams for students falling under class improvement, ATKT and failed subject categories will be conducted by respective universities after the new academic year begins. These exams will have to be conducted within 120 days of the new academic year

➤ Autonomous universities have also been advised to follow the same rules

SNDT University will also have to follow the same rules

File photo



**Pune:** University students not in the final semester of graduation and postgraduation would be promoted automatically without having to appear for any exam, state higher and technical education minister Uday Samant announced on Friday.

Only those in the final semester would have to appear for exams to be held between July 1 and 30, he said.

He also said if the lockdown was extended further, a review of the final-semester exams would be carried out between June 20 and 25. The new academic year will begin on September 1 and the results will be announced by August 15.

Students not in the final semester would be promoted and graded based on their performance in previous semesters along with their performance in the current semester. "Those who fail in this grading will also be promoted, but they will have to appear for a re-exam in the new academic year," said Samant.

"Students studying on allowed to keep terms (ATKT) scheme will also be promoted. They will also appear for the exam in new academic year. Every university will announce its own schedule of exams for final-semester students and also for repeaters once the academic year starts," he said.

Samant said an expert committee had been set up with Mumbai University vice-chancellor Suhas Pednekar as coordinator and six other members, including officials from the higher education department and vice-chancellors (VCs) of other universities in Maharashtra, including Nitin Karmalkar, VC of Savitribai Phule Pune University (SPPU), as one of its members.

The committee submitted a report on May 6 which was discussed with chief minister Udhav Thackeray and deputy chief minister Ajit Pawar, among others, said Samant. He said the UGC guidelines issued last week mandated conduct of exams for final-year students.

Attendance of 45 days during the lockdown period will be considered as present for all students. The minister said the universities must consider students failing to meet the attendance guidelines for exams and gradation on humanitarian grounds.

Samant said, "If it was not possible to conduct the practicals physically, then universities should consider journal assignments and online orals exams for marking."

Karmalkar said the SPPU was trying to set up a redressal cell to clear doubts of students in Pune, Nashik and Ahmednagar. "All important decisions of the university will be conveyed to students through this cell."

**Times of India: 9.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

## केवळ अंतिम वर्षाच्या महाविद्यालयीन परीक्षा होणार

**मुंबई, (प्रतिनिधी)** : राज्यातील सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्राच्या आणि अंतिम वर्षाच्याच परीक्षा घेतल्या जाणार असून इतर सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून केली. अंतिम सत्र व वर्गाच्या या परीक्षा जुलै महिन्यात होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी परीक्षेसंदर्भात फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून सामंत यांनी संवाद साधला. १ ते ३१ जुलै दरम्यान शेवटच्या वर्षाच्या परीक्षा घेण्यात येतील, असेही ते म्हणाले. पण सध्या कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती पुढे देखील कायम राहिल्यास २० जूनदरम्यान बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून हा निर्णय महाविद्यालयीन परीक्षेसंदर्भात विद्यापीठ अनुदान मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार नेमलेल्या समितीच्या अहवालावरून घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. समितीने दिलेल्या अहवालाविषयी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्याशी चर्चा करून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करूनच निर्णय घेण्यात येत असल्याचेही सामंत म्हणाले.

**... तरीही परीक्षा देता येणार**

२३ मार्चपासून लॉकडाउनमुळे महाविद्यालये बंद आहेत. या काळातील विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीची नोंद घेतली जाणार नाही. या ४५ दिवसांची हजेरी लागणार असून विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येईल, असेही यावेळी सामंत यांनी स्पष्ट केले. तसेच हे ४५ दिवस वगळता ज्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५ टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांचादेखील विद्यापीठांनी सहानभूतीपूर्वक विचार करून त्यांनी परीक्षेस बसू द्यावे, अशी सूचनाही सामंत यांनी दिल्या आहेत.

## 'Only final year exams to be held'

### Exams likely to take place in July, results in August, says minister

**ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Finally, the wait and anxiety among lakhs of students pursuing higher education at university level ended on Friday, after the Maharashtra Higher and Technical Education Minister Uday Samant announced that only final year examinations of all the branches of undergraduate and postgraduate courses will be held.

In a live Facebook interaction with the students, Samant announced that except for final year students, all other students will be either promoted or as per the University Grants Commission (UGC) guidelines will be carried forward as per their academic performance.

Following the UGC guidelines on examination and the academic calendar, a committee was set up by the State government consisting of six members-- Mumbai University Vice-Chancellor (VC) Suhas Pednekar, Savitribai Phule Pune University (SPPU) VC Nitin Karmalkar, SNDT University's VC Sashikala Wanjari, Kolhapur's Shivaji University VC Devanad Shinde, Technical Education Director Abhay Wagh, Higher Education Director Dhanraj Mane. The committee reviewed and submitted its report on May 6.

**HIGHLIGHTS OF THE EXAMINATION DECISION**

- Except for final year students, all other students will be promoted.
- Attendance for 45 days to be marked 'present'.
- UG/PG/Diploma practicals which haven't been held, can be marked/evaluated based on alternative provision-- online oral or another way.
- ATKT students will be promoted to next year.
- Universities can make a decision on 'summer vacation' as per their convenience keeping in mind all the parameters and UGC guidelines.
- Universities must set-up information cell and counseling cell in every district.

**Examination in July**

About eight to nine lakh students will be appearing for the final examination across Maharashtra, stated Samant. "Exams of the final year -- last semester or annual examination will be held. Universities have been directed to notify students about the timetable of examination within two days," said Samant. The minister also stated that the attendance of students for these 45 days of lockdown will be considered as 'students were present on campus'. He also stated that the exams are most likely to be held in the month of July and students should prepare accordingly.

"As per the UGC guidelines, the exams will be conducted between July 1-30. The guidelines have also mentioned that if the lockdown situation and COVID-19 cases remain the same, then the above-mentioned authorities will once again review the situation on June 20-25," said Samant.

SPPU VC Nitin Karmalkar informed that the university administration is working to formulate an action plan about conduct of examination as announced by the State education minister.

**Students to be promoted**

"Students who have been promoted to next year-- if they feel their grades are low and wish to improve it, they will be given an opportunity to appear for an improvement examination next year. This examination can be held by universities according to their convenience," said Samant.

He added, "A few exams in SPPU and Mumbai University have already been conducted. In such cases, it has been decided that the university will compare the marks received in the exam and grades as per the academic performance and whichever marks is better will be considered for promotion."

**Sakaal Times: 9.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# अंतिम परीक्षेसाठी नियोजन सुरू

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार असल्या, तरी त्या नेमक्या कशा प्रकारे घेतल्या जातील, याबाबत आता विद्यार्थ्यांना उत्सुकता आहे. परीक्षांच्या संचालनाबाबतचा कृती आराखडा लवकरच तयार होणार आहे. पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर 'चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टीम' लागू असल्याने त्यानुसारच अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करावे लागणार आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे १ ते ३१ जुलै या कालावधीत घेण्यात येतील, असे शुक्रवारी जाहीर करण्यात आले. त्यामुळे आता या परीक्षांच्या नियोजनाची तयारी विद्यापीठांना करावी लागणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता; तसेच अभ्यास मंडळातील ज्येष्ठ सदस्यांनी कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली यासाठी कृती आराखडा तयार करण्यास सुरुवात केली आहे.



> विद्यापीठाच्या परीक्षांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, त्यांचा परीक्षांबाबत संभ्रम दूर करण्यासाठी; तसेच तणावाच्या या काळात विद्यार्थ्यांचे योग्य ते समुपदेशन करण्यासाठी जिल्हानिहाय व्यवस्था करण्यात येत आहे. या माध्यमातून विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत सरकारचे निर्णय पोहोचवण्यात येतील.
>
> - **डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

अंतिम परीक्षेची वेळ काय असेल, बैठक व्यवस्था कशी असेल, अंतर्गत गुणांचे मूल्यांकन आदी बाबी विचारात घेऊन परीक्षेचे नियोजन करण्यात येईल. इंजिनीअरिंग, एमबीए आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अखेरच्या वर्षातील प्रोजेक्टबाबतही यूजीसी; तसेच 'एआयसीटीई'च्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेण्यात येईल. कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ न देता या परीक्षांचे चोख आयोजन करण्याच्या दृष्टीने आता नियोजन सुरू आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

महाविद्यालयांच्या परीक्षा होतील की नाही, याबाबत विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालकांत संभ्रम होता. या सर्वांवर तोडगा काढण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती स्थापन केली होती. या समितीच्या अहवालावर नुकतीच चर्चा करण्यात आली. तो राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेनंतर शुक्रवारी उदय सामंत यांनी परीक्षांबाबत निर्णय जाहीर केला. याबाबत 'मटा'ने शुक्रवारी प्रसिद्ध केले होते. त्यावर सामंत यांनी शुक्रवारी माहिती देऊन शिक्कामोर्तब केले. राज्यात सुमारे ३३ लाख विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असून, त्यातील सुमारे नऊ लाख अंतिम वर्षात शिकत आहेत.

### सीईटी जुलैमध्ये

राज्य सामायिक परीक्षा कक्षाकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षा जूनमध्ये होतील. पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा १ ते १५ जुलै या कालावधीत, तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा २३ ते ३० जुलै या कालावधीत होणार आहेत. या परीक्षा जिल्हास्तरासोबतच तालुकास्तरावर घेण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून, येत्या आठ दिवसांत परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

**Maharashtra Times: 9.5.2020**

लोकमत

# केवळ अंतिम वर्ष, अंतिम सत्राच्या परीक्षा

## इतर सत्रांतील विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश; १ सप्टेंबरपासून नवे शैक्षणिक वर्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयस्तरांवरील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या केवळ अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा १ जुलै ते ३० जुलैदरम्यान होणार असून, नवीन शैक्षणिक वर्ष १ सप्टेंबरपासून सुरु होईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. इतर सत्रांच्या परीक्षा होणार नसून त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल. हा प्रवेश देताना त्यांचे ग्रेड्स व गुणही त्यांना दिले जातील, असेही सामंत यांनी स्पष्ट केले. ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत, त्यांना अंतर्गत मूल्यमापनावर ५० टक्के ग्रेड व ५० टक्के यापूर्वीच्या सत्रातील परीक्षेचे गुण (पान ८ वर)



### पुणे विद्यापीठाचे वेळापत्रक ३-४ दिवसांत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सुमारे सव्वा लाख विद्यार्थी अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. विद्यापीठ कायद्यानुसार परीक्षा मंडळाच्या बैठकीत मान्यता घेऊन त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक येत्या तीन-चार दिवसांत ठरविले जाईल, असे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांची संपूर्ण ४५ दिवस हजेरी

उन्हाळी सुट्ट्यांबाबत प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचा विचार करुन प्रत्येक विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, अशा सूचना सामंत यांनी विद्यापीठांना दिल्या. तसेच ४५ दिवसांच्या लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थी हे महाविद्यालयांमध्ये उपस्थित होते असे समजूनच त्यांची उपस्थित गृहीत धरण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता कोणत्याही संभ्रमास बळी पडू नये व अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन सामंत यांनी केले.

Pune Main
Page No. 1 May 09, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

लोकमत

# विद्यापीठ करणार परीक्षांचा कृती आराखडा

पुणे : राज्यभरातील विविध अभ्यासक्रमांच्या केवळ अंतिम वर्षाचीच परीक्षा घेण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून कार्यक्षेत्रातील परीक्षांचा सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याची माहिती कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

लॉकडाऊनमुळे शाळा व महाविद्यालये मागील दीड महिन्यांपासून बंद आहेत. बहुतेक वर्गांचा अभ्यासक्रम पूर्ण झालेला नाही. त्यातच अजूनही कोरोनाचा संसर्ग आटोक्यात न आल्याने लॉकडाऊनचा कालावधी १७ मे नंतरही वाढविण्याची शक्यता आहे. शाळांच्या परीक्षा यापूर्वीच रद्द करण्यात आल्या आहेत. पण उच्च शिक्षण विभागाने परीक्षांबाबत अद्याप काहीही स्पष्ट केले नव्हते.

शुक्रवारी याबाबत या विभागाचे मंत्री उदय सामंत यांनी केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले. मात्र, या परीक्षा कधी होतील, यापूर्वी झालेल्या परीक्षांमध्ये विविध विषयांत अनुत्तीर्ण झालेले व पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांबाबतची भूमिका याबाबत संभ्रम कायम आहे. अंतिम वर्षासह बहुतेक विद्यार्थी गावी परतले आहेत. आता अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार असल्याने या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यार्थ्यांना परत यावे लागणार आहे. पण परीक्षा कधी होणार, हेच स्पष्ट करण्यात आले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. करमळकर यांनी सांगितले की, विद्यापीठांच्या परीक्षांबाबत विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) तसेच, राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार विद्यापीठाकडून नियोजन करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात घ्यावयाच्या परीक्षांबाबत सविस्तर कृती आराखडा तयार केला जात आहे. यामध्ये सर्व बाबींचा समावेश असेल.

Hello Pune
Page No. 4 May 09, 2020
Powered by: erelego.com

# Only final-year univ students to take exams, rest to be promoted

University students not in the final semester of graduation and postgraduation will be promoted automatically without having to appear for any exam, state higher and technical education minister Uday Samant announced on Friday.

Only those in the final semester will have to appear for exams to be held between July 1 and 30, he said.

He also said if the lockdown was extended further, a review of the final-semester exams would be carried out between June 20 and 25. The new academic year will begin on September 1 and the results will be announced by August 15. Swati Shinde Gole reports. P 3

## No school fee hike for next year

The state education department on Friday asked schools not to hike fees for the next academic year. P 3

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

## अंतिम वर्ष वगळता विद्यापीठांच्या इतर परीक्षा रद्द

### उर्वरित विद्यार्थ्यांचे पूर्वकामगिरीनुसार मूल्यांकन

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील विद्यापीठीय परीक्षांचे अंतिम वर्ष किंवा अंतिम सत्र वगळता इतर सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये घेण्यात येतील, तर उर्वरीत विद्यार्थ्यांच्या पूर्वकामगिरीनुसार मूल्यांकन करून त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली.

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वेळापत्रकाबाबत शासनाने कुलगुरू आणि अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या शिफारसी राज्यातील समितीनेही कायम ठेवल्या आहेत. या समितीच्या शिफारसीननुसार अकृषी विद्यापीठांमधील फक्त अंतिम वर्षाच्या किंवा सत्र पद्धत असल्यास अंतिम सत्राच्याच परीक्षा होणार आहेत. इतर सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. परीक्षा न होणाऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांची आतापर्यंतची कामगिरी लक्षात घेऊन त्यानुसार त्यांचे निकाल जाहीर करण्यात येतील. अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश दिला जाईल. त्यांना पुढील चार महिन्यांत परीक्षेची संधी देण्यात येणार असून, परीक्षेमध्ये राहिलेल्या सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल.

विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन जुलैमध्ये करून १५ (पान ५ वर)



### सामाईक प्रवेश परीक्षा जुलै अखेरीस

राज्यातील तंत्रशिक्षण, विधि, शिक्षणशास्त्र यांसह विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा (सीईटी) प्रवेश नियमन प्राधिकरण घेते. या परीक्षा २३ ते ३१ जुलै दरम्यान घेण्याचे प्राधिकरणाच्या विचाराधीन असून त्याचे सविस्तर वेळापत्रक येत्या आठ दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती सामंत यांनी दिली.

### सीबीएसईच्या परीक्षा १ ते १५ जुलै दरम्यान

**मुंबई:** केंद्रीय शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या राहिलेल्या परीक्षा १ ते १५ जुलै या कालावधीत घेण्यात येतील, असे मनुष्यबळ विकास मंत्री रमेश पोखरियाल यांनी शुक्रवारी जाहीर केले.

सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या मिळून जवळपास ४९ विषयांच्या परीक्षा घेता आल्या नाहीत. वाढलेली टाळेबंदी, परीक्षांसाठी लागणारा कालावधी आणि पुढील वर्षाचे वेळापत्रक यांचा विचार करून मंडळाने फक्त महत्वाच्याच विषयांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. दहावी आणि बारावीच्या २९ विषयांची परीक्षा घेण्यात येणार आहे.

लोकसत्ता Sat, 09 May 2020
https://epaper.loksatta.com/c/51726468

## अंतिम वर्ष वगळता विद्यापीठांच्या इतर परीक्षा रद्द

(पान १ वरून) ऑगस्टपर्यंत निकाल जाहीर करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. मात्र गरज भासल्यास २० जून रोजी परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार निर्णयात बदल करण्यात येतील, असे सामंत यांनी सांगितले. फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

### उपस्थितीबाबत नियम...

- टाळेबंदीच्या कालावधीत विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहित धरण्यात येईल.
- उन्हाळी सुट्टीबाबत विद्यापीठ त्यांच्या स्तरावर निर्णय घेईल.
- विद्यार्थी व पालक यांच्या शंकाचे निरसन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सामुपदेशन केंद्र स्थापन करण्यात येईल.
- गोंडवाना विद्यापीठ हे सुरक्षित क्षेत्रात (ग्रीन झोन) येत असल्यामुळे तेथील तेथील परिस्थिती पाहून विद्यापीठ वेळापत्रक निश्चित करेल.
- एसएनडीटी विद्यापीठाच्या राज्यातील महाविद्यालयीन परीक्षा या वेळापत्रकानुसारच होतील. इतर राज्यातील परीक्षा तेथील परिस्थितीनुसार होतील.

### परीक्षा आणि मूल्यांकन कसे?

- चार वर्षांच्या अभ्यासक्रमातील केवळ आठव्या सत्राची, पाच वर्षांच्या अभ्यासक्रमातील फक्त दहाव्या सत्राची, तर द्विवार्षिक अभ्यासक्रमाच्या केवळ चौथ्या सत्राची परीक्षा होईल.
- वार्षिक परीक्षा असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या केवळ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल.
- विद्यार्थी शिकत असलेल्या वर्षातील किंवा सत्रातील अंतर्गत मूल्यमापनाचे ५० टक्के आणि आधीच्या सत्रातील किंवा वर्षातील ५० टक्के गुण ग्राह्य धरून मूल्यांकन करण्यात येईल.
- पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचे फक्त अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ग्राह्य धरून सरासरी काढण्यात येईल.
- या मूल्यांकनानुसार अनुत्तीर्ण झाल्यास किंवा 'एटीकेटी' असल्यास विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश मिळेल. मात्र, राहिलेल्या सर्व विषयांत पुढील परीक्षेत विद्यार्थ्याला उत्तीर्ण व्हावे लागेल.
- शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर चार महिन्यात ही परीक्षा घेण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना निकालात सुधारणा करायची असल्यास पुढील परीक्षा देता येईल. ही परीक्षा ऐच्छिक असेल.
- अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या नसल्यास विद्यार्थ्यांचा प्रकल्प, प्रयोगवही यांच्या आधारे किंवा ऑनलाईन तोंडी परीक्षा घेऊन मूल्यांकन करण्यात येईल.

लोकसत्ता Sat, 09 May 2020
https://epaper.loksatta.com/c/51726612

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

hindustantimes

# UG final-year exams between July 1 and 30: state minister

Shreya Bhandary
shreya.bhandary@hindustantimes.com

MUMBAI: After weeks of confusion, higher and technical education minister Uday Samant on Friday clarified that the state will hold exams of all final-year undergraduate (UG) courses between July 1 and 30, while the first and second-year students will be promoted to the next academic year.

"All the university students, except those in the final year of their graduation course, will be promoted to the next academic year by their respective universities. Final-year students will appear for their exams between July 1 and 30," said Samant during a Facebook Live session held in the afternoon, after several students across the state posed the question.

The move has come less than a week after a University Grants Commission (UGC)-appointed panel released a report recommending similar directives to varsities across the country.

CONTINUED ON P10

## DECISION TO PROMOTE WARDS EVOKES MIXED REACTION

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: The wait to know whether university exams will happen or not in the state got over after Uday Samant, state minister for higher and technical education, on Friday clarified that all final year students will be appearing for exams and first and second year students will be promoted to the next academic year. While Savitribai Phule Pune University (SPPU) has welcomed the decision, college principals in the city choose to differ.

Prof Nitin Karmalkar, SPPU vice-chancellor, said, "We will be conveying to our students about today's decision announced by the honourable minister about the university exams to be held in July. All queries and issues of students related to exams will be addressed. We are also taking steps to counsel students as we are going through a crisis situation. District-wise arrangements will be done from our side for students. An action plan for exams will soon be prepared and declared by the varsity."

Ravindrasinh Pardeshi, principal, Fergusson College, said, "Today's decision taken by the state government is good looking at the current crisis situation and it is according to the recommendations given by the University Grants Commission (UGC)."

CONTINUED ON P10

**Hindustan Times: 9.5.2020**

hindustantimes

## College exams

During his interaction, Samant said the final-year exam dates will be clarified in the coming days and but if the lockdown is extended beyond June 30, the state will again hold a meeting between June 20 and 25 to confirm their next decision on the status of final-year exams. "As of now, we expect the universities to ensure that a timetable is ready for all final-year students and all exam results are announced by August 15 so that the next academic year can begin by first week of September," he said.

For the first and second-year students, the state has decided to adopt UGC's recommendation and promote students based on a 50-50% gradation formula, in which 50% will be allocated for a student's performance in internals and other projects in the current semester and 50% for the student's performance in the previous semester. "Students who have allowed-to-keep-term (ATKT) remarks for any subject from the previous semester will be promoted, but will have 120 days once the new academic year starts to appear for an exam and clear the subject," added Samant.

The minister has asked universities to decide on the exam duration. "We may have to cut short the exam time from to two hours, or we might also decide to take a 50-mark theory exam, but such decisions will be left to the university. We also suggest each of the university decide on the summer vacation dates," said Samant, and added that any practical exams should be taken online in order to maintain social distancing rules.

Samant also pointed out at the UGC's minimum compulsory attendance rule for students and said that the 45 days of lockdown should be considered by institutes as time spent in college by all students and added to the current attendance record of students. Samant has also requested universities to set up help desks and online counselling to ensure all queries of students and parents are answered.

Samant also clarified that the state common entrance test (CET) and Directorate of Technical Education (DTE) officials are currently working on the schedule for entrance exams, which will be shared within the next eight days.

**PARENTS OF STUDENTS IN KYRGYZSTAN ASK STATE GOVT TO HELP**

The parents of three Kalyan students, pursuing their MBBS course from Kyrgyzstan, have appealed to the state to bring their children back home amid the coronavirus crisis. Kalyan Shiv Sena corporator Ravi Patil on Friday spoke to the chief minister (CM) Uddhav Thackeray and Thane guardian minister Eknath Shinde on the issue. There are 203 students from the state, who are stranded in Kyrgyzstan.

*(Inputs from Sajana Nambiar)*

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# SPPU issues post-lockdown plan for affiliated colleges, institutes

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has released the first draft of the Covid-19 prevention protocol to be followed by 705 affiliated colleges, 234 recognized institutes, 46 on-campus departments and 71 research institutes when they reopen after the lockdown. The advisory will address further concerns in due course, said university officials.

The 30-page protocol document seeks to address every minute detail that goes into the running of academic establishments. From completing 1/3rd of the syllabus online, staggered lunch breaks and curbs on the presence of outsiders in hostel rooms, to cancelling all social gatherings and sports events until further notice, the university has created a list of safety measures to be followed in classrooms, hostels, laboratories, canteens, etc.

SPPU registrar Prafulla Pawar said, "This is an advisory to all institutes, not a binding document. It has been published so that whenever institutes re-open, some measures are in place to curb the spread of the virus."

SPPU pro vice-chancellor NS Umrani said, "Senior academics Kuldip Charak and Mahesh Abale have authored the document after perusing various literature available currently."

The e-booklet will be sent to all affiliated colleges and other institutes under SPPU, added vice-chancellor Nitin Karmalkar. "Social distancing is key to preventing the spread of the coronavirus hence we need to avoid all large gatherings for the next academic year. Sanitization and fumigation of the entire campus would be done at least twice daily. All institutes and departments would be asked to install a sanitizer spray machine at the entrance," he said.

Karmalkar further said that it has become imperative that all teachers be trained in online communication tools so that at least 1/3rd of the syllabus can be taught virtually. "The university will create a separate link to upload course-wise and topic-wise content. While regular counselling will now be a feature, we have also given an opportunity for interested students to complete a course on counselling online so that they can help college students resolve and handle psychological concerns post-lockdown."

The document also includes points such as the compulsory use of hand sanitizers and face masks for the long term. Charak, a director of the Navsahyadri Group of Institutes, explained, "Subjecting staff and visitors to non-contact thermal scanner checks or temperature checks at the time of entry will also be among the measures that must be adopted by institutes for the long term."

Graphic: Aamir Shaikh

### BIG CHANGES IN THE SCHEME OF THINGS

**Once they reopen, campuses will wear a new look to maintain social distancing. Here's a look at some key changes expected in the new academic year**



**CLASSROOMS**

- Seating arrangement in classrooms will be in a way that students maintain at least 3-4 feet distance from each other
- Sessions that see attendance in large numbers to be arranged in seminar halls
- Student gatherings and other such events won't be encouraged until further order
- Students' lunch breaks to be planned on a staggered time schedule so as to avoid crowding at one location

**FACULTY**

- Teachers will significantly reduce personal interaction with students and opt for e-mails, WhatsApp groups, or similar tools when not in classroom
- Handling assignments, projects, or other such submissions will be largely though electronic modes

**SPORTS**

- As far as possible, the department, college, or institute should not allow games or sports events to be held until things approach normalcy
- Under very closely monitored circumstances, the only games that can be allowed will be those where teams are very small, such as badminton, table tennis, carom, chess etc

**HOSTEL**

- Social distancing to be ensured in entertainment areas by the hostel rector
- Non-residents/ visitors will be allowed to meet the hostelites only in designated socializing areas

**CANTEEN/ DINING AREAS**

- Waiters will use full PPE gear and maintain reasonable distance while serving people

**Times of India: 11.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

लोकमत

# विद्यापीठातर्फे समुपदेशन केंद्र सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रातील तीनही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना 'कोविड-१९' आणि महाविद्यालयीन परीक्षेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन केंद्र सुरु केले आहेत. पुणे जिल्ह्यात ४, नाशिक जिल्ह्यासाठी २ आणि अहमदनगर जिल्ह्यासाठी ३ महाविद्यालयांची समुपदेशन केंद्र म्हणून निवड केली आहे, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांच्या परीक्षा पुढे ढकलल्या होत्या; मात्र विद्यापीठ अनुदान आयोगासह (यूजीसी) आणि राज्य शासनाच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी परीक्षांच्या निर्णयाबाबत नियोजन करण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन केली होती.

### समुपदेशन केंद्रांची जिल्हानिहाय यादी

**पुणे :**

१) काशिबाई नवले कॉलेज ऑफ फार्मसी

२) एच. व्ही. देसाई कॉलेज

३) आर्ट, कॉमर्स, सायन्स कॉलेज, इंदापूर

४) इंपिरिअल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, वाघोली

**नाशिक :**

१) केटीएचएम कॉलेज, नाशिक

२) के. के. वाघ कॉलेज, नाशिक

**अहमदनगर :**

१) विखे पाटील इंजिनिअरिंग कॉले

२) न्यू आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉले

३) मालपाणी कॉलेज, संगमनेर

Pune Main
Page No. 2 May 12, 2020
Powered by: erelego.com

# SPPU to release action plan for exams in 1st week of June

PRANITA ROY
@PranitaRoy

**PUNE:** After the Maharashtra government announced that exams for only final year students will be held, Savitribai Phule Pune University (SPPU) is formulating its action plan about the conduct of the examination. The action plan likely to be out by the first week of June.

On Friday, State Minister of Higher and Technical Education Uday Samant declared that examination for only final year students will be conducted, while others are exempted due to the lockdown in the wake of coronavirus disease (COVID-19).

He had also stated that as per the University Grants Commission (UGC) guidelines on examination and the academic calendar, it is likely to be held in July.

The SPPU authorities are now exploring ways to conduct the examination for final year students studying in over 700 affiliated colleges.

University Pro-Vice-Chancellor NS Umarani stated that decision makers in the varsity are looking at the various aspects related to conducting an examination and post-COVID sessions, especially during this health crisis. "We are preparing a document and about 90 per cent is ready. Deans of all the faculty will review the document and it will be passed through the board of examination and academic council. After this, the document will be released for public," said Umarani.

SPPU Registrar Prafulla Pawar stated that infrastructure to conduct the examination also needs to be sorted.

"The action plan also includes data of the number of final year students appearing course-wise, among them how many have backlogs--whether they have any backlogs in previous years or not," he said.

Over the next 15 days, the action plan will be discussed and a concrete format of the examination should be ready. The examination schedule along with all the details of its conduct will be released by the first week of June, Umarani told Sakal Times.

**Sakaal Times: 12.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

लोकमत

# अंतिम सत्रातील परीक्षांबाबत २० जून रोजी परिस्थिती पाहूनच घेणार निर्णय - उदय सामंत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील कोरोनाच्या संसर्गाबाबत २० जून रोजी पुन्हा आढावा घेऊन त्यानंतरच अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील परीक्षा घ्यायच्या की नाहीत, याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यार्थ्यांना दिली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आगामी शैक्षणिक वर्ष व समस्या या विषयावर त्यांनी फेसबुकद्वारे संवाद साधला.

अनेक स्वायत्त आणि खासगी विद्यापीठे विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याच्या तयारीत असल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी या वेळी केल्या. त्यावर आपण उद्याच सर्व विद्यापीठांच्या प्रशासन आणि कुलगुरुंशी संवाद साधणार आहोत. यूजीसीच्या निर्देशांप्रमाणे, राज्य शासनाच्या धोरणानुसारच स्वायत्त, खासगी विद्यापीठांना परीक्षांबाबतचे धोरण राबवावे लागेल. याबाबत लवकरच निर्णय जाहीर करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



### भविष्यात ऑनलाइन शिक्षण

**भविष्यात ऑनलाइन शिक्षणासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग प्रयत्नशील राहणार असल्याचे उदय सामंत यांनी म्हटले. अनेक विद्यापीठे यादृष्टीने पावले उचलत असून काही ऑनलाइन स्टुडिओ उभारुन व्हर्चुअल लेक्चर्स कसे घेता येतील, आपले सॅटेलाइट चॅनेल** कसे सुरु करता येईल यादृष्टीने प्रयत्न करत असल्याचे सांगितले. नेट कनेक्टिव्हिटीचा अडथळा लक्षात घेता ग्रामीण विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी व्हर्च्युअल रुपात ऑनलाइन क्लासेसचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

ज्या विद्यार्थ्यांनी शुल्क भरले आहे, मात्र परीक्षा झाली नाही त्यांच्या शुल्काबाबत काय निर्णय घ्यावा, यासंदर्भात येत्या २ दिवसांत राज्यातील सर्वच अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंशी चर्चा करून निर्णय जाहीर करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

अंतिम सत्रातील ज्या विद्यार्थ्यांच्या बॅकलॉगच्या परीक्षा बाकी आहेत, त्यांना १ ते ३० जुलैदरम्यान या परीक्षांच्या दरम्यानच त्या द्याव्या लागतील. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी, परीक्षेत मदत व्हावी यासाठीही विद्यापीठांच्या कुलगुरुंशी चर्चा करून येत्या २ दिवसांत निर्णय घेण्यात येईल. सीईटी रद्द केल्यास लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येऊ शकते, अशी माहिती त्यांनी सीईटी रद्द करा या विद्यार्थ्यांच्या मागणीला उत्तर देताना दिली. तसेच यंदा सीईटी जिल्हास्तरावर घेण्याऐवजी तालुकास्तरावर घेण्याचे नियोजन करत असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र हे उच्च व तंत्रशिक्षण परीक्षांच्या बाबतीत निर्णय घेणारे पहिले राज्य असून इतर अनेक राज्ये हेच धोरण फॉलो करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

Solapur Main
Page No. 7 May 12, 2020
Powered by: erelego.com





Image Courtesy: Google Images

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# नवीन शैक्षणिक वर्ष १ सप्टेंबरपासून सुरू होईल

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

**प्रतिनिधी ▸▸ मुंबई**

नवीन शैक्षणिक वर्ष १ सप्टेंबर २०२०पासून सुरू होईल. बारावीची राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तालुकास्तरावर घेण्याचा विचार सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण केंद्राची निर्मिती करण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (दि. ११) फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी त्यांनी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. ते पुढे म्हणाले की, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉगचे पेपर याच वर्षी घेतले जातील. त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. समाज माध्यमांच्या माध्यमातून चुकीची माहिती प्रसारित करू नये, असे त्यांनी आवाहन केले.

ते पुढे म्हणाले की, सर्व विद्यार्थ्यांनी घरी राहून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. आपल्या आरोग्याची आम्ही हमी घेतोय. त्यामुळे याबाबत कोणी चिंता बाळगण्याचे कारण नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसारच सर्व निर्णय घेतले गेले आहेत. कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची आम्ही पूर्णपणे काळजी घेतोय, असा विश्वास व्यक्त केला.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन परीक्षा घेतल्या जातील. स्वायत्त आणि खासगी विद्यापीठे यांना महाराष्ट्र शासनातर्फे पत्र पाठविण्यात येणार आहे. स्वायत्त शिक्षण संस्थांची भूमिका ही राज्य शासनाच्या निर्णयानुरूप असणार आहे. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की ज्याने २५ लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. यामध्ये केवळ विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मंत्री सामंत यांनी दिली.

### मुक्तविद्यापीठाला निर्णय लागू

**मुक्तविद्यापीठाला राज्यशासनाचा निर्णय लागू असेल. अकृषी विद्यापीठांसाठी जे नियम असतील तेच त्यांनाही लागू होतील. विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार करून या परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे. पीएचडी आणि एम. फिल. चे प्रबंध सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा विचार शिक्षण विभाग करीत असल्याचे त्यांनी सांगितले.**



ePaper देशोन्नती Tue, 12 May 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/51823386

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

### अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांची बॅकलॉगची परीक्षा होणार

**पुणे, ता. १२ :** 'आमचे विषय बॅकलॉग राहिले आहेत, त्याची परीक्षा होणार का?' हा प्रश्न प्रथम,द्वितीय, तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पडला आहे. त्यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्टता आणली आहे. केवळ अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांची बॅकलॉगची परीक्षा होईल. इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांची बॅकलॉगची परीक्षा नवीन शैक्षणिक वर्षात होणार आहेत.

राज्य सरकारने विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांचा निर्णय नुकताच जाहीर केला. त्यामध्ये अंतिम वर्षाच्या व अंतीम सत्रांच्या विद्यार्थ्यांची परीक्षा जुलै महिन्यात घेतली जाणार आहे. पण ज्यांचे मागच्या वर्षीचे काही विषय राहिले आहेत (बॅकलॉग) त्यांचे काय होणार हे स्पष्ट झाले नव्हते. त्यामुळे विद्यार्थी चिंतेत होते. विशेषतः ज्या विद्यार्थ्यांना आता तिसऱ्या व चौथ्या वर्षात प्रवेश दिला जाणार आहे,

पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यांकन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, 'राज्य सरकारच्या सुचनेनुसार आता केवळ अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार आहे, त्यांना नापास केले जाणार नाही.''

**Sakal: 13.5.2020**

### परीक्षांचा फेरविचार होणार

#### अभ्यासावर लक्ष केंद्रित करा : उदय सामंत

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १२ : राज्यातील अकृषी विद्यापीठातील ३२ लाखांपैकी २५ लाख विद्यार्थ्यांच्या या वर्षीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार असून ७ ते ८ लाख विद्यार्थ्यांकडून नाराजीचा सूर उमटत आहे. या विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत २० जून रोजी आढावा घेण्यात येईल, यावेळी परीक्षांचा फेरविचार करू, पण आता अभ्यास करा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. या वर्षी केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार आहेत. मात्र, या विद्यार्थ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. परीक्षा होणाऱ्या ७ ते ८ लाख विद्यार्थ्यांच्या पालकांनीही धीर धरावा, पॅनिक होऊ नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यूजीसीला आम्ही सर्व परिस्थिती कळवणार आहोत. मात्र जोपर्यंत यूजीसीकडून कोणतीही स्पष्ट सूचना येत नाही तोपर्यंत या विद्यार्थ्यांनी परीक्षा आहेत, असे समजूनच घरी राहून शांतपणे अभ्यास करावा, असेही सामंत यावेळी म्हणाले.

**परीक्षा शुल्कासंदर्भात बैठक होणार**

परीक्षा काही दिवसांत होणार होत्या, ज्या विद्यार्थ्यांनी ज्या त्या विद्यापीठांना परीक्षा व अन्य फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काबाबत निर्णय घेता येईल. राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी बैठक होणार असून, त्या बैठकीत परीक्षा शुल्काबाबतचा निर्णय घेण्यात येईल. विद्यार्थी-पालकांच्या हिताचाच विचार यावेळी करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी निश्चिंत राहावे, असेही सामंत यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले.

**Sakaal: 13.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

**Section : Education**

## डॉ. शाळिग्राम यांच्याकडे परीक्षा संचालकाचा कार्यभार

**पुणे, ता. १५ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठापुढे परीक्षांचे नियोजन करण्याचे आव्हान असताना, परीक्षा व मूल्यांकन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे कोल्हापूरमध्ये अडकून पडले आहेत. त्यामुळे परीक्षा विभागाच्या निर्णय प्रक्रियेत येत असलेल्या अडथळ्यांमुळे या विभागाचा कारभार डॉ. अरविंद शाळिग्राम यांच्याकडे दिला आहे.

डॉ. शाळिग्राम हे ३१ जानेवारीला सेवानिवृत्त झाले. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यांकन मंडळाच्या संचालकपदी डॉ. महेश काकडे यांची निवड झाली होती. काकडे यांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात परीक्षा संचालक पदावर काम केले आहे. त्यानंतर त्यांनी आता पुणे विद्यापीठाची जबाबदारी स्वीकारली. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या आदेशानुसार याबाबत परिपत्रक काढले आहे.

**Sakal: 16.5.2020**

## विद्यापीठ परीक्षापद्धती लवकरच निश्चित

### पाच समित्या स्थापन ; महाविद्यालय स्तरावर चर्चा करून अहवाल

**पुणे, ता. १५ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम सत्राच्या परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात याचे नियोजन करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर चर्चा करण्यासाठी पाच समित्या स्थापन केल्या आहेत. लवकरच या समित्यांचा अहवाल विद्यापीठाला सादर होऊन परीक्षा कशा पद्धतीने घ्याव्यात हे निश्चित होणार आहे.**



पुणे विद्यापीठाने परीक्षेची तयारी सुरू केली आहे. पदवी व पदव्युत्तरच्या शेवटच्या सत्रातील परीक्षा होणार असून, ही संख्या सुमारे अडीच लाख आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठास परीक्षेचे सूक्ष्म नियोजन करावे लागत आहे. विद्यापीठाने विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास या चार विद्याशाखांच्या अधिष्ठातांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येकी एक समिती नेमली आहे, तसेच अतंर्गत विभागांसाठी एक समिती नेमली आहे. प्रत्येक विद्याशाखा संबंधित महाविद्यालये, प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी परीक्षा कशी घ्यावी यावर चर्चा करीत आहे. या समित्यांचा अहवाल परीक्षा मंडळाच्या मुख्य समितीकडे सादर होणार आहे. मुख्य समितीत कुलगुरू, परीक्षा मंडळाचे संचालक, प्र-कुलगुरू, चार अधिष्ठाता यांचा समावेश आहे. ही समिती परीक्षा पद्धतीवर शिक्कामोर्तब करणार आहे.

> **विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या परीक्षा कशा पद्धतीने व्हाव्यात, यासाठी महाविद्यालयांशी चर्चा सुरू असून, अहवाल लवकरच विद्यापीठास सादर होईल. विद्यार्थ्यांची सोय व सर्व शाखांचा विचार करून धोरण निश्चित होईल.**
>
> – **डॉ. मनोहर चासकर,** अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग

#### 'एमसीक्यू' पद्धतीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता

विद्यापीठाने आमच्याशी चर्चा केली असून, कमी कालावधीत परीक्षा पार पाडायची असेल तर बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) पद्धतीने परीक्षा व्हाव्यात असा पर्याय दिला आहे. हा पर्याय इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, फार्मसी, एमबीएम, एमसीए यासह वाणिज्य, विज्ञान व कला शाखेलाही लागू होऊ शकतो. तसेच, या पद्धतीमध्ये ऑनलाइन किंवा ऑफलाइन परीक्षा होऊ शकते, असे काही प्राध्यापकांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले.

> **विद्यापीठाने परीक्षा घेताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विचार करणे गरजेचे आहे. सर्वच विद्यार्थ्यांकडे लॅपटॉप व संगणक नाहीत. तसेच, मोबाईललाही चांगली कनेक्टिव्हिटी मिळत नाही. पुणे रेड झोनमध्ये असल्याने त्याचाही विचार होणे आवश्यक आहे.**
>
> – **कमलाकर शेटे,** विद्यार्थी, पुणे विद्यापीठ

**Sakaal:16.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# SPPU committees to formulate action plan for examinations

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has established five committees, inclusive of all deans of four faculties, to formulate an action plan for the examinations. The four faculties include commerce and management studies, science and technology, humanities as well as interdisciplinary studies. Under each faculty, one committee has been set up and the fifth one is of a university-level panel for its departments.

About 2.46 lakh final year students across 150 graduation and post-graduation degree and diploma courses will be appearing for the examination. Considering the number, the varsity has been micro-planning the format.

According to the announcement by the State Education Minister Uday Samant, the Maharashtra

**FINAL YEAR EXAMS**

government has decided to take final year examinations, whereas students of all other years will be promoted. The discussion on examination format for final year students is underway.

The main committee consists of SPPU Vice-Chancellor (VC) Nitin Karmalkar, Pro-VC NS Umarani with examination board director and all four deans of faculties who will review each committee reports.

"These committees have been set-up to understand the issues of each faculty in detail to hold the examination. As soon as each committee submits its reports to the main committee, we will deliberate a discussion on it and announce the final decision," said Umarani.

While students have expressed that examinations should be held, however, the varsity should consider issues of students from rural areas. "Everyone doesn't own a laptop/computer, neither there is good network connectivity. Nevertheless, Pune is also in the red zone. The university should make the decision keeping all these factors in mind," said SPPU student Kamlakar Shete.

**Sakaal Times: 16.5.2020**

लोकमत

# अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा लेखी पद्धतीने होणार

## विद्यापीठाचा निर्णय । फिजिकल डिस्टन्सिंगचे नियम पाळून परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पारंपरिक लेखी पद्धतीने परीक्षा घेतल्या जाणार आहेत. फिजिकल डिस्टन्सिंगचे नियम पाळून या परीक्षा घेण्याचे विद्यापीठाने निश्चित केले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा बहुपर्यायी, ऑनलाइन इतर पद्धतीने होणार, या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विद्यापीठाच्या परीक्षांबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार अंतिम वर्षातील विषयांची पारंपरिक पद्धतीने लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या विषयांचे निकाल ५० टक्के अंतर्गत गुण व ५० टक्के अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षांच्या एकत्रित गुणांच्या मूल्यमापनावर आधारित असतील. अंतिम वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक मौखिक परीक्षा व्यवहार्यता तपासून अंतर्गत मूल्यमापनाद्वारे किंवा व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतल्या जाणार आहेत.

विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. जी. चासकर म्हणाले, ''विद्यार्थ्यांना १२० दिवसांच्या कालावधीत क्लास इम्प्रूव्हमेंटसाठी संधी दिली जाणार आहे. तसेच, ज्यांनी क्लास इम्प्रूव्हमेंटसाठी अर्ज केले आहेत. त्यांनी पुन्हा परीक्षा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.''



- परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना १९ मे ते २८ मेदरम्यान ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरता येणार
- अंतिम वर्ष वगळता इतर कोणत्याही विद्यार्थ्यांची परीक्षा होणार नाही.
- अंतिम वर्षाचे विद्यार्थी सोडून सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जातील.
- परीक्षेसंदर्भात कार्यवाही करताना कोविड-१९ प्रादुर्भाव प्रतिबंधक उपाययोजना करणे तसेच त्या संदर्भात शासनाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य राहील.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर फिजिकल डिस्टन्सिंगचे नियम पाळून विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा पारंपरिक लेखी पद्धतीने होणार आहेत. अंतिम वर्षातील कोणत्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जाणार, याबाबतचे सविस्तर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच, प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निकाल कोणत्या पद्धतीने प्रसिद्ध केला जाणार, याविषयीची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- **डॉ. अरविंद शाळिग्राम**, प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 4 May 17, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# पुणे विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाइनच

**पुणे, ता. १६ : कोरोनामुळे कमी कालावधीत परीक्षा पार पाडण्याचे आव्हान असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विचार करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदाच्या परीक्षा ऑफलाइनच ( पारंपरिक पद्धतीने लेखी परीक्षा) घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे परीक्षा ऑनलाइन होणार की ऑफलाइन या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे.**

### परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदत

अंतिम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेला नाही, त्यांना १९ ते २८ मे या दरम्यान ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे. यासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही विलंब शुल्क आकारले जाणार नाही, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

कोरोनामुळे सर्वच विद्यापीठ, महाविद्यालयांचे वेळापत्रक कोलमडून पडले. या परीक्षा कशा घ्याव्यात, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगा (यूजीसी)ने तसेच राज्य सरकारने कुलगुरूंची समिती नेमली होती. यूजीसीने परीक्षेबाबत निर्देश देताना केवळ शेवटच्या सत्राच्या किंवा वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जावी. ही परीक्षा ऑनलाइन किंवा ऑफलाइन घेता येईल, तसेच प्रश्नपत्रिकांचे स्वरूप बदलून कमी वेळात परीक्षा संपवावी, असे त्यात नमूद केले होते. राज्य सरकारनेही याबाबत असेच निर्देश दिले होते. मात्र परीक्षा कमी वेळेत संपविण्यासाठी व सोशल डिस्टन्सिंग ठेवण्यासाठी ऑनलाइन परीक्षांना प्राधान्य द्यावे असा मतप्रवाह होता. तर विद्यार्थी संघटनांनी ऑनलाइन परीक्षेस विरोध करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विचार करून पारंपारिक पद्धतीने लेखी परीक्षा द्यावी अशी मागणी केली होती.

पुणे विद्यापीठात शेवटच्या सत्रातील/वर्षातील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २ लाख ४६ हजार आहे. परीक्षेचे नियोजन करण्यासाठी विद्यापीठात बैठकांचे सत्र सुरू होते. पुण्यातील महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन परीक्षेची सुविधा असली तरी पुणे जिल्हा, नगर, नाशिक येथील अनेक महाविद्यालयात पुरेसे संगणक, इंटरनेटची सुविधा नाही. तरीही ऑनलाइन परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते अशी चर्चा बैठकांमध्ये समोर आली. त्यामुळे विद्यापीठाची परीक्षा लेखी घेण्यावर आज (शनिवारी) शिक्कामोर्तब करण्यात आले. डॉ. अरविंद्र शाळीग्राम म्हणाले, "विद्यापीठाच्या सर्व परीक्षा लेखी पद्धतीने होणार आहेत, कोणत्याही अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन होणार नाही हा महत्वाचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप कसे असेल, किती गुणांची परीक्षा असेल हे ठरविण्यासाठी विद्याशाखांच्या समित्या नेमल्या आहेत. त्यांच्या शिफारशीनुसार निर्णय होईल."

विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर म्हणाले, "विद्यापीठाने ऑफलाइन पद्धतीने लेखी परीक्षा घेण्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार आता प्रश्नपत्रिका अशी असेल, किती गुणांची असेल, त्याचे मूल्यांकन कसे करायचे हे विद्यापीठाने नेमलेल्या विद्याशाखांच्या समित्यांना ठरवता येणार आहे. याबाबत लवकरच कुलगुरूंना अहवाल सादर केला जाईल."

**Loksatta: 17.5.2020**

# विद्यापीठ कर्मचाऱ्यांना उद्या हजर राहण्याचे आदेश

**पुणे, ता. १६ :** लॉकडाऊनच्या काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अनेक कर्मचारी, अधिकारी मुख्यालय सोडून दुसऱ्या गावांमध्ये गेले आहेत. या सर्वांना सोमवारपर्यंत विद्यापीठात हजर रहावे, असे आदेश विद्यापीठ प्रशासनाने दिले आहेत.

``कोरोना``चा प्रतिबंध करण्यासाठी लॉकडाऊन सुरू झाल्यावर पुणे विद्यापीठाच्या आवारात रहाणारे अनेक कर्मचारी,अधिकारी विद्यापीठ सोडून बाहेर गेले आहेत. ज्यांना बाहेर जायचे होते त्यांनी परवानगी घेऊन विद्यापीठ सोडणे अपेक्षीत होते. मात्र सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुमारे २०० जण पुण्याबाहेर आहेत. त्याचा परिणाम विद्यापीठाच्या कामकाजावर होत आहे.

या कर्मचारी व अधिकारी यांना परत येण्यासाठी परवानगी मिळत नसल्याने ते तिकडेच अडकून पडले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने यासंदर्भात पत्र दिले तर आम्हाला पुण्यात परत येता येईल, अशी विनंती प्रशासनाला केली होती.

पुणे विद्यापीठात परीक्षा, नवीन शैक्षणिक वर्ष, अभ्यासक्रम यासह इतर महत्त्वाची कामे सुरू आहेत.या काळात विद्यापीठात राहण्याची गरज पडत आहे. त्यामुळे लॉकडाऊन किंवा संचारबंदीत मुख्यालय सोडून इतर ठिकाणी असलेल्या अधिकारी, कर्मचार्यांनी १७ मेपर्यंत परत यावे आणि कामावर रूजू झाल्याचा इ मेल करावा, असे आदेश दिले आहेत.

याबाबत कुलसचिव प्रफुल्ल पवार म्हणाले, "मुख्यालय सोडून बाहेर गेलेल्या कर्मचारी, अधिकारी यांना परत येण्यासाठी परिपत्रक काढले आहे. प्रवासाचा परवाना मिळविण्यासाठी कर्मचारी, अधिकारी यांना त्यांच्या ओळखपत्रासह हे परिपत्रक उपयुक्त ठरेल.

**Sakal: 17.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# डिजिटल क्लासरूमचे नियोजन करा : मुख्यमंत्री

**मुंबई, दि. १९** - करोना संकटामुळे शाळा प्रत्यक्ष उघडता आल्या नाहीत, तर राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना डिजिटल क्लासरुममध्ये सामावून घेण्यासाठी प्रणाली विकसित करावी लागेल, त्यासाठी नियोजनाचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

शैक्षणिक वर्षाच्या नियोजनासाठी शालेय आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा आढावा मुख्यमंत्री ठाकरे यांनी सोमवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतला. शाळा सुरू नाही झाल्या तरी शिक्षण सुरू राहण्यासाठी तज्ज्ञांशी चर्चा करून नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी चार भिंतीतील शाळा सुरू होऊ शकली नाही, तर ऑनलाइन-शिक्षण, डिजिटल माध्यमाच्या पर्यायांचा विचार करावाच लागेल. शहरात इंटरनेट सेवा उपलब्ध असते. त्यामुळे या ठिकाणी ऑनलाइन, व्हर्च्युअल क्लासरुम्स पर्याय वापरता येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

प्रणाली विकसित करण्यासाठी शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांशी बोलून राज्यातील शाळांचा अभ्यास करून आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. करोनाचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर होईल. जागतिकस्तरावर बदल होऊ शकतात. परंतु, मुलांचे शैक्षणिक वर्ष प्रभावित होऊ नये. म्हणूनच शैक्षणिक वर्ष नियमितपणे सुरू करण्यासाठी सर्वसमावेशक योजना विकसित केली जावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**Prabhat: 20.5.2020**

लोकमत

# अंतिम वर्षाच्या परीक्षा होणे अवघडच

**मुंबई :** विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि मानसिकतेचा विचार करून अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा न घेता ग्रेडिंग देऊन पदवी देण्यात यावी, असे पत्र राज्य शासनाकडून विद्यापीठ अनुदान आयोगास देण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. मात्र, सीईटीच्या परीक्षा होणार असल्याचेही त्यांनी स्पष्टकेले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून सामंत यांनी मंगळवारी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बारावीनंतरच्या सीईटीच्या परीक्षा मात्र होणार असून त्यांच्या तारखा त्यांनी जाहीर केल्या असल्या तरी त्याबाबतही परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी म्हटले. पदवीसाठी असणारी सीईटी परीक्षा जुलैमध्ये घेण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर होणारी परीक्षा ही तालुक्याच्या ठिकाणी घेतली जाईल. तसेच जे विद्यार्थी आपल्या मूळ रहिवासाच्या ठिकाणी गेले आहेत किंवा ज्यांना निवडलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे शक्य होणार नसेल याचा विचार करून त्यांना निवडलेले परीक्षा केंद्र बदलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. टाळेबंदीमुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत जाणे शक्य होणार नाही, त्यांची व्यवस्था विभागाकडून करण्यात येईल, अशी माहितीही सामंत यांनी दिली.

### इतर प्रवेशप्रक्रिया सुरु

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पदव्युत्तर वैद्यकीय व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. टाळेबंदीमुळे किंवा तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन लिंक सुरु होऊ शकल्या नाहीत तर त्या लिंक पुन्हा सुरु करण्यात येतील. ज्यांच्या परीक्षा रद्द झाल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा शुल्क त्यांना परत देण्याबाबत अथवा ते शुल्क पुढच्या सत्रात वापरता येईल का, याबद्दल लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

Pune Main
Page No. 5 May 20, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका

## अंतिम वर्षाच्या परीक्षा आवश्यक : डॉ. एकबोटे

**पुणे** : पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय चुकीचा ठरेल. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा निर्णय करू नये, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य आणि आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. गजानन एकबोटे यांनी व्यक्त केले.

अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे. राज्यपाल हे विद्यापीठांचे कुलपती आहेत. गरज पडल्यास त्यांना पत्र लिहून हस्तक्षेप करण्याची मागणी केली जाईल, असे डॉ. एकबोटे यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, परीक्षा तीन तासांऐवजी दोन तासांची करता येऊ शकते. सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून परीक्षा घेता येऊ शकते. परीक्षा पुढे ढकलली तरी चालण्यासारखे ठरेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत परीक्षेशिवाय पदवी दिली जाऊ शकत नाही. परीक्षेशिवाय पदवी देणे हा लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ ठरेल हे राज्य सरकारने लक्षात घेणे आवश्यक आहे.



स्वस्त लोकप्रियता मिळविण्यासाठी परीक्षा न घेण्याची भूमिका मांडली जात आहे, अशी टीका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य आणि विद्यापीठ विकास मंचाचे ज्येष्ठ कार्यकर्ते धनंजय कुलकर्णी यांनी केली. या प्रकारच्या चुकीच्या निर्णयातून विद्यार्थ्यांची वैयक्तिक गुणवत्ता संपेलच, शिवाय आयुष्यभर त्यांना अडचणींचा सामना करावा लागेल, असे सांगून कुलकर्णी म्हणाले की, विद्यापीठांच्या शैक्षणिक स्वायत्ततेमध्ये सरकारने हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही. विद्यापीठ अनुदान मंडळाने या आधीच मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली असून, परीक्षा रद्द करण्याची विद्यार्थ्यांची मागणी नाही. सरकारने अट्टहासाने निर्णय पुढे ढकललाच तर आम्ही न्यायालयात आव्हान दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**Kesari: 21.5.2020**

**पुणे परिसर** पुणे, गुरुवार, २१ मे २०२० ४

# विद्यार्थ्यांवर बसेल 'कोरोना बॅच'चा शिक्का

## सरकारच्या भूमिकेबाबत तज्ज्ञांची नाराजी; परीक्षा रद्द केल्यास नुकसान

**ब्रिजमोहन पाटील** : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. २० : कोरोनामुळे सध्याचा काळ कठीण आहे. मात्र, यामुळे पदवी आणि पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांना ग्रेड पद्धतीने गुण देणे धोकादायक आहे. यातून मार्ग काढून शासनाने परीक्षा घेतल्याच पाहिजेत. राज्य सरकारला जबाबदारी टाळता येणार नाही. अन्यथा या विद्यार्थ्यांवर 'कोरोना बॅच' म्हणून शिक्का बसेल आणि उच्च शिक्षण व नोकऱ्यांवर गंडांतर येईल, अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.**



कोरोनामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केलेल्या शिफारशीनुसार राज्य सरकारने केवळ शेवटच्या सत्राच्या/वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. आता राज्य सरकारही परीक्षा न घेता ग्रेड देऊन विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याच्या तयारीत आहे. तसे पत्र उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यूजीसीला पाठवले आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रात अवस्थता निर्माण झाली आहे.

शिक्षण तज्ज्ञ, माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ म्हणाले, ''राज्य सरकारने अंतिम वर्ष सोडून इतरांच्या परीक्षा घ्यायच्या नाहीत, हा निर्णय घेताना गडबड केली होती. त्यानंतर आता अंतिम वर्षाचीही परीक्षा न घेणे हा चुकीचा निर्णय आहे. लेखी परीक्षा शक्य नसल्यास तोंडी परीक्षा तरी घेतल्या पाहिजेत.''

### या कारणांसाठी परीक्षा झाली पाहिजे

- आपण आता कुठे आहोत?, हे विद्यार्थ्यांना स्पष्ट होण्यासाठी.
- ग्रेडने पास केल्यास फायदा दिसेल; पण विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करावा लागेल.
- परदेशासह इतर ठिकाणी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना 'ग्रेड' गुणांना महत्त्व राहणार नाही.
- अनेकजण नोकरी व शिक्षणाच्या संधीपासून वंचित राहतील.
- उच्च शिक्षणाचा दर्जा व विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होईल.

**फक्त महाराष्ट्रातच अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द होणार असतील तर उच्च शिक्षणाचा दर्जा व विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होईल. विद्यार्थ्यांवर 'कोरोना बॅचची मुले' असा शिक्का पडेल. स्थिती गंभीर असली तरी सोशल डिस्टन्सिंग ठेऊन ऑगस्टमध्ये परीक्षा घेता येतील.**
**- डॉ. शरद जावडे,** शिक्षणतज्ज्ञ

**पदवी प्राप्त केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अनेक विद्यार्थी परदेशात जाण्याचा प्रयत्न करतात. जर परीक्षा रद्द केल्या तर परकीय शिक्षणाच्या संधीच मिळणार नाही. विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई येथील परीक्षा केंद्र न देता इतर ठिकाणी केंद्र देता येईल.**
**- डॉ. गजानन एकबोटे,** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

**परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना ग्रेड कसे देणार? हा मोठा प्रश्न आहे. परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलांना प्रवेश मिळणे अवघड होईल. तसेच अभ्यास करणाऱ्यांवर अन्याय होईल. ज्यावेळी हे विद्यार्थी बाहेर जातील तेव्हा 'पेपर डिग्री' म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाईल.**
**- ॲड. एस. के. जैन, शिक्षण प्रसारक मंडळी**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

### शिक्षणतज्ज्ञांचे मत; उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या भूमिकेवर विरोधकांचीही टीका

# अंतिम वर्षाची परीक्षा रद्द केल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई/ पुणे/ नागपूर :** विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी राज्यातील विद्यापीठांनी सुरू केली असताना या परीक्षाच रद्द करण्याची मागणी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) केली आहे. मात्र, परीक्षा रद्द केल्यास विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होईल, असे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले असून, विरोधकांनीही सरकारच्या भूमिकेवर टीका केली आहे.

विद्यापीठाच्या फक्त अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा पर्याय विद्यापीठ अनुदान आयोगाने दिल्यानंतर याबाबत कुलगुरू आणि अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या आयोगाच्या निर्णयाला दुजोरा देत परीक्षा घेण्याचे अनेक पर्याय सूचवले होते. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला. पुणे, मुंबई, नागपूर आदी विद्यापीठांनी जुलैमध्ये या परीक्षा घेण्याची तयारीही सुरू केली. वेळापत्रक आखणे, प्रश्नसंच तयार करणे अशी तयारी विद्यापीठांमध्ये सुरू आहे. मात्र, *(पान २ वर)*

## कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञांचा विरोध

अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द केल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, असे मत राज्यातील कुलगुरूंनी व्यक्त केले. 'परीक्षा घेण्याचे अनेक पर्याय आहेत. प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा रद्द करणेही चूक आहे. अंमित वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजनही केले जात आहे,' असे मत एका कुलगुरूंनी व्यक्त केले. 'विद्यार्थ्यांनी मागणी केल्याने उत्तीर्ण करण्याचे निकष बदलणे, तर कधी परीक्षा रद्द करण्याची मागणी, असे प्रकार दबाव आणून घडवले जातात. विद्यार्थी संघटनांनी त्यांच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. आपण खरेच विद्यार्थी हिताचे काम करतो आहोत का, याचा विचार संघटनांनी करावा' असेही एका कुलगुरूंचे म्हणणे आहे.



'सध्याची अपवादात्मक परिस्थिती पाहता मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना एकत्र बोलावणे व्यवहार्य नाही. मात्र, त्यावर पर्याय शोधता येऊ शकतील. तात्विकदृष्ट्या, शैक्षणिक हिताच्या दृष्टीने परीक्षा रद्द करणे योग्य नाही,' असे मत मुंबई विद्यापीठाच्या एका माजी कुलगुरूंनी व्यक्त केले.

> उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विद्यार्थ्यांच्या भावनांशी खेळत आहेत. ८ मे रोजी परीक्षा झाली पाहिजे असे सामंत म्हणत होते आणि आता अचानक यूजीसीला पत्र पाठवून सरकार अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यास असमर्थ असल्याचे सांगणे खेदजनक आहे. शिक्षणमंत्र्यांच्या या चुकीच्या निर्णयामुळे अंतिम वर्षात शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते.
>
> \- स्वप्नील बेगडे, महाराष्ट्र प्रदेश मंत्री,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

लोकसत्ता Thu, 21 May 2020
https://epaper.loksatta.com/c/52088376

# अंतिम वर्षाची परीक्षा रद्द केल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान

*(पान १ वरून)* युवासेनेसह इतर विद्यार्थी संघटनांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासही विरोध केला. त्यानंतर आता अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्याही परीक्षा घेऊ नयेत, अशी भूमिका घेत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्रीच या संघटनांच्या बरोबरीने उभे राहिल्याचे दिसत आहे.

'करोनाच्या संसर्गाचा वेग पाहता सामाजिक अंतराच्या निकषांचे पालन करून महाराष्ट्रातील साधारण ८ ते १० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे व्यवहार्य ठरणार नाही. विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचा विचार करून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्याही परीक्षाही न घेता त्यांना श्रेणी प्रदान करण्यासाठी मान्यता देण्यात यावी. त्याबाबत मार्गदर्शक सूचना द्याव्यात,' असे पत्र सामंत यांनी आयोगाला पाठवले. आयोगाने पत्रावर काही उत्तर न दिल्यास दोन दिवसांत राज्याच्या स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले.

## विदर्भातील विद्यापीठांकडून वेळापत्रक जाहीर

विदर्भातील चारही विद्यापीठांनी परीक्षा आणि त्याचे मूल्यमापन कसे होईल, याबाबतचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा समावेश आहे. राज्य शासनाने ८ मे रोजी जाहीर केलेल्या पत्रातील शिफारशीचा आधार घेत या विद्यापीठांनी १ ते ३१ जुलैदरम्यान परीक्षा घेण्याचे जाहीर केले आहे. नागपूर आणि अमरावती विद्यापीठाने परीक्षा महाविद्यालय स्तरावरच होणार असून अंतिम वर्षात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयाच्या परीक्षाही जुलै महिन्यात मुख्य परीक्षेच्या आधी महाविद्यालयीन स्तरावर होणार असल्याचे म्हटले आहे.

> पदवीनंतर विद्यार्थ्यांना राज्यात, राज्याबाहेर किंवा परदेशातील अभ्यासक्रमात प्रवेश घ्यायचा असल्याने परीक्षा होणे महत्त्वाचे आहे. सर्व कुलगुरूंनीही तसेच सुचवले आहे. बहुधा शिक्षणमंत्र्यांनाही तसेच वाटत आहे. मात्र, युवासेनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे यांना नाही म्हणता येत नसल्याने सामंत यांनी यूजीसीला पत्र पाठवण्याची पळवाट काढली. परीक्षांबाबतचा निर्णय विद्यापीठांतील विद्या परिषदेने घ्यावा, असे विद्यापीठ कायदा सांगतो. राज्य सरकारला त्यात निर्देश देता येत नाहीत. काही निर्देश द्यायचे असल्यास कुलपती म्हणजे राज्यपाल देऊ शकतात. विद्यापीठ परीक्षांबाबत कुलगुरु, शिक्षणतज्ज्ञ जे म्हणतात ते ऐकले पाहिजे.
>
> \- विनोद तावडे, माजी शिक्षणमंत्री

लोकसत्ता Thu, 21 May 2020
https://epaper.loksatta.com/c/52088488

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# नव्या शैक्षणिक वर्षाची ऑनलाइन पद्धतीने नांदी

### डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना विषाणू संसर्गामुळे नव्या शैक्षणिक वर्षाबाबत संदिग्धता असताना डेक्कन एज्युकेशन सोसायटीने महाविद्यालये ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्याचे नियोजन केले आहे. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालयाचे वर्ग बुधवारपासून (२१ मे) सुरू होणार असून, मुंबई, सांगली येथील महाविद्यालयेही लवकरच सुरू होणार आहेत.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे यांनी बुधवारी झालेल्या ऑनलाइन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संस्थेचे कार्यवाह धनंजय कुलकर्णी, स्थानिय



व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. नितीन आपटे, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रोहिणी होनप यांनी या पत्रकार परिषदेत सहभाग घेतला.

'करोना विषाणू संसर्गामुळे परिस्थिती पूर्वपदावर कधी येईल याची शाश्वती नाही. त्यामुळे टाळेबंदीच्या काळात पूर्व प्राथमिक ते पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शिक्षकांचे ऑनलाइन अध्यापनासाठीचे प्रशिक्षण घेतले. आता प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी मायक्रोसॉफ्ट टीम्स या संकेतस्थळाचा अधिकृत परवाना खरेदी करण्यात आला आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थी, प्राध्यापकांना त्याचा लाभ घेऊन शैक्षणिक कामकाज सुरु करता येईल. सर्व अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ग वगळता अन्य वर्षांचे अध्यापन सुरू होईल,' असे कुंटे यांनी सांगितले.

ॲड. आपटे म्हणाले, की आतापर्यंत गरज म्हणून ऑनलाइन वर्ग घेतले जात होते. पण आता द्वितीय वर्षापासून पुढील वर्ग घेतले जातील. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंदही ठेवली जाईल. ऑनलाइन साधने वापरताना त्यांना अभ्यास साहित्यही पुरवणे शक्य होईल. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक स्तरावर ई साधनांचा वापर केला जात आहे. पालकांशी व्हॉट्सअॅपद्वारे संपर्क ठेवून कलाकौशल्य, शारीरिक शिक्षण, नियमित अभ्यासासंदर्भातील माहिती दिली जात असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

लोकसत्ता Thu, 21 May 2020
https://epaper.loksatta.com/c/52088773

# अंतिम वर्षाच्या परीक्षांवरून खणाखणी

## सामंत यांच्या पत्राबाबत राज्यपाल नाराज

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाला (यूजीसी) पत्र लिहून अनावश्यक हस्तक्षेप केल्याबाबत सामंत यांना आवश्यक सूचना करा. त्यानंतरच अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबतचा प्रश्न असंख्य विद्यार्थ्यांशी संबंधित असल्याने, हा घोळ तातडीने मिटवा,' असे खरमरीत पत्र कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहून आपली नाराजी व्यक्त केली आहे.

सामंत यांच्या परीक्षा न घेण्याबाबतच्या निर्णयामुळे शैक्षणिक वर्तुळात विरोधाला सुरुवात झाली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेदेखील राज्यपाल


भगतसिंह कोश्यारी


उदय सामंत

कोश्यारी यांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याबाबतचे निवेदन दिले असून, परीक्षा न घेण्याच्या निर्णयाबाबत लक्ष घालण्याची विनंती केली होती. त्यावर आता कोश्यारी यांनी खरमरीत पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिले आहे.

या पत्रामध्ये कोश्यारी यांनी लिहिले आहे, 'अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेणे हा यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा भंग करणे आहे. परीक्षा न घेण्याबाबतचे पत्र यूजीसीला लिहीत असल्याची माहिती मला दिली नाही. सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठांनी परीक्षा घेणे आणि विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करणे, हा हक्क मिळाला आहे. परीक्षा न घेता, विद्यार्थ्यांना पदव्यांचे वाटप करणे, हे तत्त्वाच्या विरोधात आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ कायद्यातील कलमांचे उल्लंघन आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने लॉकडाउनच्या कालावधीत योग्य सुरक्षित उपाययोजनांचे पालन करून, राज्य मंडळ, सीबीएसई, आयसीएसई मंडळाला इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा घेण्याला परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे यूजीसीनेदेखील विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत, तसेच शैक्षणिक वेळापत्रक तयार करण्याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत.'

## परीक्षा टाळून श्रेणी देण्यास विरोध

**पुणे :** राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील विद्यापीठांमध्ये अंतिम वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता, त्यांना श्रेणी द्यावी, अशी विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाला (यूजीसी) केल्यानंतर शिक्षण वर्तुळात विरोधाला सुरुवात झाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांनी याबाबत पत्र लिहून विरोध दर्शविला आहे.

> विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या, तर उच्च शिक्षण, संशोधन व परदेशातील शिक्षणाच्या संधी मिळणार नाहीत. विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर याचा गंभीर परिणाम होईल. विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई येथील परीक्षा केंद्र न देता इतर ठिकाणी केंद्र देता येईल.
>
> - डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे पुढील अभ्यासक्रमांचे प्रवेश, परदेशी विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांचे प्रवेश, नोकरीच्या संधी या गोष्टींवर विपरीत परिणाम होणार असल्याने, या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी होत आहे.

अनेक विद्यार्थी पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात जोमाने अभ्यास करतात; जेणेकरून त्यांचे अंतिम गुण आणि सरासरी सुधारेल व त्याचा भविष्यात फायदा होईल. त्याचप्रमाणे उच्चशिक्षण व संशोधनासाठी फायदा होईल. परीक्षा रद्द झाल्यास विद्यार्थ्यांची ही संधी हुकणार आहे. या निर्णयासंदर्भात विद्यापीठाच्या अधिकार मंडळाचे मत जाणून घ्यावे; तसेच अधिसभेच्या सदस्यांची 'झूम'द्वारे सभा आयोजित करावी, अशी मागणी विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. श्यामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. दरम्यान, 'परीक्षा रद्द न करता, ती सुरक्षितपणे कशी घेता येईल, याचे नियोजन सरकारने केले पाहिजे,' असे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे म्हणाले.

**Maharashtra Times: 23.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

## 'अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द' निर्णयाचा फेरविचार हवा

प्रभात वृत्तसेवा



### अधिसभा सदस्यांचा पवित्रा : मंत्र्यांच्या निर्णयाला विरोध

**पुणे**, दि. २२ - राज्य शासनाने महाविद्यालयीन परीक्षांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याबाबतचे पत्र विद्यापीठ अनुदान आयोगाला (यूजीसी) पाठविले आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान करणारा आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे पुढील अभ्यासक्रमांचे प्रवेश, परदेशी विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांचे प्रवेश, नोकरीच्या संधी यावर विपरित परिणाम होणार असल्याने, या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी होत आहे.

राज्य शासनाने यापूर्वीच महाविद्यालयाच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा वगळून फक्त शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर अंतिम वर्षाचीही परीक्षा रद्द करण्याचे संकेत उच्चशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिले. त्यासाठीच त्यांनी 'यूजीसी'ला महाराष्ट्रातील अंतिम सत्राची परीक्षा रद्द करून, अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांना सरासरी गुणांच्या आधारे ग्रेड देण्यास मान्यता देण्याचे पत्र लिहिले आहे. दरम्यान, 'अनेक विद्यार्थी गुणवाढीसाठी अखेरच्या टप्प्यात खूप अभ्यास करतात. परीक्षा रद्द करण्याचा निर्णय झाल्यास विद्यार्थ्यांची ही संधी हुकणार आहे. अनेक विद्यार्थ्यांना पुढील संधीचे दरवाजे कायमस्वरुपी बंद होतील,' याकडे पुणे विद्यापीठाच्या काही अधिसभा सदस्यांनी लक्ष वेधले आहे.

### अधिसभा सदस्य म्हणतात...

अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याच काही अडचणी आहेत. मात्र योग्य नियोजनाने मार्ग काढता येईल. या निर्णयासंदर्भात सांगोपांग विचारमंथन, विद्यापीठाच्या अंतिम अधिकार मंडळाचे मत जाणून घ्यावे तसेच याबाबत अधिसभेच्या सदस्यांची झूमद्वारे सभा आयोजित करावी, अशी मागणी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रा. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंथाळकर यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**Prabhat: 23.5.2020**

---

Saturday, May 23, 2020 | 5


Updates

## 'Corona batch' tag worries members of SPPU's senate

### They have written to varsity to conduct exams

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

FILE PHOTO



Senate members fear that the students' futures will be affected if final-year exams are cancelled

With uncertainty over final examinations for bachelors and post-graduate courses, senate members from Savitribai Phule Pune University (SPPU) have written to the varsity to figure out the best way to conduct these annual tests.

Senate members and academicians in the city believe that if exams are completely cancelled and students promoted on the basis of earlier scores, then they might face a tag of "corona batch" in future.

Shamkant Deshmukh, SPPU senate member, said, "Final-year examinations are one of the most important in student life. They should be able to give the papers and earn the scores. If the marks of the examination are not considered and students are promoted, then the entire batch will get a tag of 'corona batch' and students might have problems going ahead."

Another senate member, Santosh Dhore, seconded the thought in the letter written to the varsity and informed that SPPU should discuss with the senate members and find an appropriate way to ensure that students do not miss out.

Higher education and technical minister of Maharashtra Uday Samant had previously said that the final-year examination will be conducted. However, after students raised concerns over safety to conduct them in the middle of the coronavirus pandemic, Samant wrote to University Grants Commission (UGC) that conducting examinations in Maharashtra is not possible.

Deshmukh said, "While UGC has already given guidelines about the papers to be conducted, if the exams are cancelled then students will be at loss. Students prepare hard for their final year and want to give their best as their future depends on it and those trying to get education opportunities abroad also wish to get a good score."

Arvind Shaligram, coordinator, Design Innovation Centre, SPPU, said, "Examinations are important and as of now, SPPU is planning to conduct them. Students' careers and jobs depend on final-year marks. Therefore, students should be able to sit for the exams and then get evaluated."

While the varsity has started to prepare for conducting the said tests, the minister's letter to UGC has caused uncertainty.

Mahesh Kakade, head, examination department, SPPU, only said, "We will follow whatever decision the state government takes."



# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# विद्यापीठाच्या शुल्कवाढीला स्थगिती

## करोनामुळे निर्माण झालेल्या संकटाचा विचार करून निर्णय

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कवाढीच्या निर्णयास एक वर्षासाठी स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. करोनामुळे निर्माण झालेल्या संकटाचा विचार करून विद्यापीठाने शुल्कवाढीला स्थगिती देत विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी विद्या परिषदेची बैठक झाली. त्यात विद्यापीठ प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या शुल्कवाढी संदर्भातील (पान २ पहा) ▶▶



करोनामुळे सर्वच क्षेत्रांत आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत विद्या परिषदेच्या बैठकीत शुल्कवाढीच्या शिफारशीवर चर्चा झाली. त्यानुसार शुल्कवाढसंदर्भात सकारात्मक निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात येणार आहे.

– **डॉ. एन. एस. उमराणी,** प्र–कुलगुरू, विद्यापीठ

# विद्यापीठाच्या शुल्कवाढीला स्थगिती

प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. विद्यापीठाच्या शुल्क नियमन समितीने गेल्या काही महिन्यांपूर्वी सर्व अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कात सुमारे २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने शुल्क वाढीचे परिपत्रक प्रसिद्ध केले होते. त्याची अंमलबजावणी या शैक्षणिक वर्षापासून होणार होती.

**Prabhat: 24.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

### राज्यपालांचे पत्र शिक्षण क्षेत्रात ठरले चर्चेचा विषय



**पुणे** : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांना समज द्यावी, अशी मागणी करणारे राज्यपालांचे पत्र शिक्षण क्षेत्रात चर्चेचा विषय ठरले आहे. मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सामंत यांच्यावर ठपका ठेवल्याचे मानले जात आहे.

राज्यात कोरोनाची गंभीर स्थिती लक्षात घेऊन अंतीम वर्षाच्या परीक्षादेखील नकोत, अशी अनपेक्षित भूमिका घेऊन सामंत यांनी खळबळ उडवून दिली. त्याचवेळी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी असलेल्या प्रवेश परीक्षांना मात्र, त्यांनी हिरवा कंदिल दिला. विद्यापीठ अनुदान मंडळाने अंतीम वर्षाच्या परीक्षा कोणत्याही स्थितीत घ्याव्यात, अशी स्पष्ट सुचना देऊनही सामंत यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाला नुकतेच पत्र पाठविले. यामुळे त्यांच्यावर टीका होत आहे. त्यांच्या पत्राला आक्षेप घेत शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठांनी थेट राज्यपालांना साकडे घातले. विद्यापीठांची शैक्षणिक स्वायत्तता धुडकावली जात असल्याकडे लक्ष वेधण्यात आले. राज्यपाल कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना पत्र लिहून सामंत यांच्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली असून, त्यांना समज देण्याची सूचना केली आहे.

**Kesari: 24-5-2020**

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शुल्कवाढीला स्थगिती

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने चार महिन्यांपूर्वी घेतलेला शुल्कवाढीचा निर्णय शनिवारी स्थगित केला आहे. विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या काल झालेल्या बैठकीत शुल्कवाढीच्या निर्णयाला एका वर्षासाठी स्थगिती देण्यात आली. या निर्णयाने कोरोनामुळे ओढवलेल्या परिस्थितीत पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली काल विद्या परिषदेची बैठक पार पडली. त्यात विद्यापीठ प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या शुल्कवाढ स्थगित करण्याबाबतच्या प्रस्तावाला



एका मताने मंजुरी मिळाली. विद्यापीठाच्या शुल्क नियमन

समितीने गेल्या काही महिन्यांपूर्वी सर्व अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कात सुमारे २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने शुल्क वाढीचे परिपत्रक प्रसिद्ध केले होते. कोरोनामुळे सर्वांचीच आर्थिक परिस्थिती खालावली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांकडून वाढीव शुल्क आकारणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क वाढीच्या निर्णयाला एका वर्षासाठी स्थगिती देण्यात आली. यामुळे आता पूर्वीचेच शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणार आहे.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, विद्यापीठाने सर्व संलग्न महाविद्यालयाअंतर्गत शिकवल्या जाणाऱ्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्क वाढीला एका वर्षासाठी स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता आपले अभ्यासक्रम पुरक नाही. तसेच कोरोनासारख्या साथीचा सामना करण्यासाठी आपली आवश्यक तयारी असणे गरजेचे आहे. त्यासाठी लागणारी अत्याधुनिक प्रयोगशाळा व विविध अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे, अशी चर्चाही या बैठकीत करण्यात आली. विद्यापीठातर्फे सुमारे पन्नास सुधारित अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली. त्यात फाईन आर्ट सारख्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच दहा ते बारा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. संशोधन करणाऱ्या पीएचडीच्या विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले आहे, असेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

> कोरोनामुळे घ्याव्या लागणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भातील प्रारुप आराखड्यास मान्यता घेण्यात आली. मात्र, परीक्षेचे स्वरुप नंतर ठरविले जाणार आहे. परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची खबरदारी विद्यापीठ प्रशासनातर्फे घेतली जाणार आहे. परदेशी विद्यार्थी,परराज्यातील विद्यार्थी किंवा काही कारणास्तव परीक्षा न देऊ शकलेले विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घ्यावी लागणार आहे, असे या बैठकीतून समोर आले आहे.
>
> **- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु**
> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Kesari: 24-5-2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

# परीक्षांबाबतचा निर्णय राज्यपालांच्या सूचनेनुसार

**मुंबई, (प्रतिनिधी) :** विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात राज्यपालांच्या सूचनेनुसार सरकार व मंत्री निर्णय घेतील, असे शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी शनिवारी सांगितले.

> राज्यपाल आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाते पिता-पुत्राप्रमाणे आहे...
> – **संजय राऊत**

गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी महाविकास आघाडी, शिवसेना यांचे राजभवनशी असणारे संबंध ताणले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना राज्यपाल नियुक्त आमदार करण्याच्या मुद्द्यावरून तर संजय राऊत यांनी राजभवनावर टीकास्त्र सोडले होते. त्यातच, राज्यपालांनी विद्यापीठ परीक्षेविषयी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाला पाठविलेल्या पत्रावर आक्षेप घेतला. या पार्श्वभूमीवर राऊत यांनी काल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीनंतर ते बोलत होते. राज्यपाल हे राज्याचे पालक व घटनात्मक प्रमुख आहेत, आमचे मार्गदर्शक आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यूजीसीला पाठविलेल्या पत्राबद्दल राज्यपालांनी आक्षेप घेतल्याचे विचारले असता राऊत म्हणाले, उदय सामंत यांनी त्यांचे मत व्यक्त केले आहे. अद्याप निर्णय घेतलेला नाही. राज्यपाल हे विद्यापीठाचे कुलपती असतात. त्यांनी आपली भूमिका व्यक्त केली.

**Kesari: 24-5-2020**

# परीक्षेवरून प्रश्नांची जंत्री!

## अंतिम वर्षाची परीक्षा होणार, की नाही? विद्यार्थी संभ्रमात

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** 'करोना'च्या वाढत्या संसर्गामुळे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची परीक्षा रद्द करण्याच्या विचारात आहे. त्यावर थेट कुलपती अर्थात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आक्षेप घेत नाराजी व्यक्त केली. त्यानंतर 'राज्यपालांच्या इच्छेनुसार परीक्षेसंदर्भात निर्णय होणार,' असे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही शनिवारी सांगितले. तथापि, अंतिम वर्षाची परीक्षा होणार की नाही, हा निर्णय अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

उच्चशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दि. १९ मे रोजी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाची परीक्षा रद्द करावी, अशी मागणी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पत्राद्वारे



### उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांच्या प्रस्तावावर राज्यपाल नाराज?

केली होती. 'यूजीसी'कडून काहीच उत्तर न आल्यास राज्य सरकार स्वत:च परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेणार असल्याची भूमिका त्यांनी मांडली. त्यानंतर 'यूजीसी' आणि राज्य सरकारनेही निर्णय घेतला नाही. अशा परिस्थितीत अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत लवकर निर्णय घेण्याची सूचना राज्यपाल कोश्यारी यांनी सरकारला शुक्रवारी केली आहे.

या सर्व घडामोडीनंतर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी राज्यपालांची शनिवारी भेट घेतली. त्यानंतर 'सामंत यांनी तसा निर्णय घेतलेला नाही. राज्यपाल सांगतील, त्याप्रमाणे उच्चशिक्षणमंत्री निर्णय घेतील,' असे राऊत यांनी पत्रकारांना सांगितले. त्यावरून आता परीक्षा होणार असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रातून होत आहे.

**परीक्षा अर्जासाठी विद्यार्थी साशंक**

केवळ अंतिम वर्षाची परीक्षा होणार असून, त्यासाठी दि. १९ ते २८ मे यादरम्यान परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या सूचना विद्यापीठाने केली आहे. त्यानुसार विद्यार्थी अर्ज करत आहेत. मात्र, परीक्षेच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होऊ न शकल्याने अर्ज भरायचा की नाही, अभ्यास करायचा, की नाही असा संभ्रम विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला आहे.

**Prabhat: 24.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

लोकमत

# शुल्कवाढीच्या निर्णयाला स्थगिती

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ । विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या काही महिन्यांपूर्वी जाहीर केलेल्या शुल्कवाढीच्या निर्णयाला विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत शनिवारी स्थगिती देण्यात आली. या निर्णयाने कोरोनामुळे ओढवलेल्या परिस्थितीत पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी विद्या परिषदेची बैठक पार पडली. त्यात विद्यापीठ प्रशासनातर्फे सादर केलेल्या शुल्कवाढीसंदर्भातील प्रस्तावाला एकमताने मंजुरी मिळाली. विद्यापीठाच्या शुल्क नियमन समितीने गेल्या काही महिन्यांपूर्वी सर्व अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कात सुमारे २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने शुल्कवाढीचे परिपत्रक प्रसिद्ध केले होते.



### सुधारित अभ्यासक्रमांना मान्यता

♦ विद्यापीठातर्फे सुमारे पन्नास सुधारित अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली. त्यात फाईन आर्ट सारख्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच दहा ते बारा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णयही घेण्यात आला. संशोधन करणाऱ्या पीएचडीच्या विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे निर्देश या वेळी देण्यात आले.

कोरोनामुळे सर्वांचीच आर्थिक परिस्थिती खालावली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांकडून वाढीव शुल्क आकारणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्कवाढीच्या निर्णयाला स्थगिती दिली. तसेच यापूर्वी आकारले जात असलेले जुने शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.

कुलगुरु डॉ. नितीन करमळकर म्हणाले, विद्यापीठाने सर्व संलग्न महाविद्यालयाअंतर्गत शिकवल्या जाणाऱ्या व्यावसायीक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्क वाढीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच कोरोनामुळे घ्याव्या लागणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भातील प्रारुप आराखड्यास मान्यता घेण्यात आली. मात्र, परीक्षेचे स्वरुप नंतर ठरविले जाणार आहे. परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची खबरदारी विद्यापीठ प्रशासनातर्फे घेतली जाणार आहे. परदेशी विद्यार्थी, परराज्यातील विद्यार्थी किंवा काही कारणास्तव परीक्षा न देऊ शकलेले विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घ्यावी लागणार आहे, असे या बैठकीतून समोर आले. कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता आपले अभ्यासक्रम किती तकलादू आहेत तसेच कोरोनासारख्या साथीचा सामना करण्यासाठी आपली आवश्यक तयारी असणे गरजेचे आहे.

Pune Main
Page No. 2 May 24, 2020
Powered by: erelego.com

# विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पदवी अंतिम वर्ष आणि पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याबाबतच्या कृती आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार परीक्षा प्रत्यक्ष पद्धतीने (ऑफलाइन), दीड तासांची आणि ५० गुणांची असेल. तर राहिलेल्या विषयांच्या परीक्षेसाठीच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालय स्तरावर तयार केल्या जाणार असून, त्यावर विद्यापीठाकडून देखरेख केली जाईल.

विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी ही माहिती दिली. करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारच्या समितीच्या शिफारशीनुसार पदवी अंतिम वर्ष आणि पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा जुलैमध्ये घेतली जाणार आहे. या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने पाच समित्या नेमून कृती आराखडा तयार केला आहे. तसेच गेल्या वर्षी श्रेयांक गुण पद्धती लागू केल्यानंतर आता पदवी द्वितीय वर्ष आणि पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्ष यांच्या नव्या अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले की, 'परीक्षा घेण्यासाठीच्या कृती आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. यूजीसीच्या निर्देशांनुसार त्यानुसार जुलैमध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जातील. परीक्षा प्रक्रिया गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शी पद्धतीने राबवली जाईल. तसेच बदललेल्या अभ्यासक्रमालाही मान्यता देण्यात आली. नव्या अभ्यासक्रमात काही नावीन्यपूर्ण प्रयोगही करण्यात आले आहेत. अभ्यासक्रमातील ३० टक्के भागाचे ई साहित्यही तयार केले जाणार आहे.

### शुल्कवाढ स्थगित करण्याची शिफारस

करोना विषाणू संसर्गामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचा फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना बसू शकतो. ही शक्यता विचारात घेऊन येत्या शैक्षणिक वर्षासाठीची प्रस्तावित शुल्कवाढ स्थगित करण्याची शिफारस करणारा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेला पाठवण्याचा निर्णय विद्या परिषदेत घेण्यात आला, असेही डॉ. उमराणी यांनी सांगितले. व्यवस्थापन परिषदेने ही शिफारस मान्य केल्यास प्रस्तावित शुल्कवाढीला स्थगिती मिळून विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकेल.

लोकसत्ता Sun, 24 May 2020
https://epaper.loksatta.com/c/52177405

# News Paper Clippings During May 2020

## Section : Education

### पुणे विद्यापीठाचाही 'रोजगाराभिमुख'चा नारा

# पदवी, पदव्युत्तर द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम बदलणार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदापासून पदवी व पदव्युत्तरच्या द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय घेतला आहे. करोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा विचार करून रोजगाराभिमुख आणि तंत्रज्ञानावर भर देणारा नवीन अभ्यासक्रम सुरू होणार आहेत.

विद्या परिषदेची बैठक शनिवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात अभ्यासक्रम बदलास मान्यता देण्यात आली. यात विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास या चारही विद्याशाखांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर अभ्यासपूर्ण चर्चा झाली. त्यात सुधारित अभ्यासक्रमात काय बदल अपेक्षित आहेत, त्यावर विचारमंथन झाले. या अभ्यासक्रमात रोजगाराची क्षमता वाढविणार असनू, त्यात तंत्रज्ञानाला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच अध्यापन पद्धतील बदल असून, त्यात प्रात्यक्षिकांवर अधिक भर देण्यात आला आहे. ई-कॉमर्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, इनोव्हेशन, ब्लॉक चेन अशा गोष्टींचा समावेश नवीन अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

**असा असेल नवीन अभ्यासक्रम**

नवीन अभ्यासक्रमात उद्योग क्षेत्राला पूरक आणि विद्यार्थ्यांना आवडेल, अशा पद्धतीने तयार करण्यात येत आहे. तसेच त्यात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आला पाहिजे, त्यांना रोजगारक्षम, नवीन कल्पनांचा विकास करता यावा, अशा पद्धतीने शिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रमात बदल केले आहेत, असेही डॉ. उमराणी यांनी म्हटले आहे.

**Prabhat: 25.5.2020**

# निर्णय लालफितीत, पण विद्यापीठ सज्ज

■ अंतिम वर्ष परीक्षेसाठी यंत्रणेची जुळवाजुळव ■ पुणे विद्यापीठाकडून कृती आराखडा तयार



प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २४** - राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची परीक्षा घ्यायची, की नाही? हा निर्णय मंत्रालयात लालफितीत अडकला आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकत या परीक्षा घेण्याबाबत कृती आराखडा तयार केला आहे. याला पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देत परीक्षेसाठी सज्ज असल्याचे सूचित केले आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठाने पदवीच्या प्रथम आणि द्वितीय वर्ष, तर पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. या विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यांकनावर पुढील वर्षात प्रवेश दिला जाणार आहे. परंतु, अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतल्या जाणार आहेत. त्यासाठी पुणे विद्यापीठाने यापूर्वीच पारंपरिक पद्धतीने लेखी परीक्षा होणार असल्याचे जाहीर केले. त्यानंतर विद्या परिषदेच्या बैठकीत या परीक्षा कशा पद्धतीने द्यायचा, याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यास मान्यता देण्यात आली. त्यात ५० गुणांसाठी परीक्षा दीड तासांत घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**असे आहेत प्रस्ताव**

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉगचे पेपर दि.१ ते १५ जुलै या दरम्यान होईल. महाविद्यालय स्तरावरच प्रश्नसंच काढून तिथेच पेपर तपासले जातील. दि. १६ ते ३१ जुलैदरम्यान अंतिम वर्षाची नियमित परीक्षा होईल. यामध्ये विद्यापीठ पेपर काढून ते महाविद्यालयांना पाठवणार आहेत. ५० गुणांची परीक्षा दीड तासांत घेतली जाणार असून, उत्तरपत्रिका महाविद्यालय स्तरावरच तपासल्या जाणार आहेत. त्यामुळे लवकर उत्तरपत्रिका तपासणी करून निकाल वेळेत लागणार आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही व सोशल डिस्टन्सिंग ठेवून परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

"पुणे विद्यापीठात महाराष्ट्रासह अन्य राज्यातील व परदेशातील विद्यार्थ्यांचीही संख्या मोठी आहे. हे सर्व विद्यार्थी घरी आहेत. त्यामुळे जुलैमध्ये परीक्षांसाठी येऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे. एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही. तसेच, पुण्यात येऊन परीक्षा देणे विद्यार्थ्यांना शक्य नसेल तर त्यांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सोयीचे केंद्र ही निवडण्याची संधी दिली जाणार आहे.

– डॉ. एन. एस. उमराणी, प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

**Prabhat: 25.5.2020**

# News Paper Clippings During May 2020

## Section : Health

# कॉलेजांत कोरोनासाठी ‘बंदोबस्त’

## विद्यापीठाची ‘मानक कार्यप्रणाली’ ; प्रत्येक शैक्षणिक संस्थांना सूचना

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. २९ : महाविद्यालयांमध्ये शिकणारी हजारो विद्यार्थी, येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ, गजबजलेले कॅन्टीन, अन् आवारातील कट्ट्यांवर मौजमजा करणारे मित्रमैत्रिणी हे दृश्य हमखास दिसते. परंतु, आता सप्टेंबरपासून महाविद्यालये सुरू होताना ‘कोरोना’चा संसर्ग होऊ नये म्हणून महाविद्यालयांनी काय केले पाहिजे, यासाठी प्रत्येक विभागवार ‘मानक कार्यप्रणाली’ तयार करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी करावी, अशा सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व संस्थांना दिल्या आहेत.**

‘कोरोना’च्या काळात उद्योगधंदे सुरू होत असताना प्रत्येक कंपनीने ‘स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसेस’ (मानक कार्यप्रणाली) तयार केली आहे. याच धर्तीवर महाविद्यालय, विद्यापीठांनी काम केले तर संसर्ग टाळता येऊ शकतो. यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. महेश अबाळे आणि नवसह्याद्री ग्रुप ऑफ इस्टिट्यूटचे संचालक प्रा. डॉ. कुलदीप चरक यांनी प्रत्येक विभागाचा विचार करून ‘मानक कार्यप्रणाली’ तयार केली. त्याचा प्रस्ताव कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे सादर केला. त्यास मान्यता देण्यात आली आहे. शिक्षण, आरोग्य, सामान्य प्रशासन, उद्योग, संशोधन या क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करून ती तयार करण्यात आली आहे. महाविद्यालयातील १८ विभागांचा समावेश आहे, असे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले.

**“ कोरोनाच्या छायेत महाविद्यालयांत सुरू झाल्यावर काय काळजी घ्यावी, असे धोरण अस्तित्वात नव्हते. त्यामुळे प्रा. कुलदीप चरक यांच्या मदतीने सर्व महाविद्यालयांसाठी पुस्तिका तयार केली आहे. यामुळे सोशल डिस्टन्सिंगसह इतर उपाययोजना करून महाविद्यालये भरविता येतील.**
– **महेश अबाळे**, व्यवस्थापन परिषद सदस्य, पुणे विद्यापीठ

**“ अत्यंत उपयुक्त नियमावली असल्याने महाविद्यालयांनी त्याची अंमलबजावणी करावी. यात काही बदल हवे असल्यास त्यासाठी सूचना करण्याचे आवाहनही केले आहे.**
– **डॉ. एन. एस. उमराणी**, प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ



### वर्गखोल्या

- वर्ग, बेंच, खिडक्या, दारे सॅनिटाइज करावेत
- दोन बेंचमध्ये सुरक्षित अंतर असावे
- विद्यार्थ्यांचे तापमान मोजले जावे
- जेवणाच्या वेळा भिन्न असाव्यात

### ग्रंथालय/लॅब

- बसण्याचा व्यवस्थेत किमान चार फूट अंतर असावे
- लॅबमध्ये कमी मुलांना बोलवावे
- लॅब प्रमुखाने पीपीई किट वापरावे
- ग्रंथपालांसाठी बसण्याची जागा स्वतंत्र व सुरक्षित असावी
- पुस्तक, संगणक इतर वस्तू सॅनिटाइज कराव्यात





### वसतिगृह

- लॉबी, डायनिंग हॉल, स्वच्छ असावे व गर्दी टाळावी
- बाहेरच्या व्यक्तीला सॅनिटाइज आवारातच प्रवेश
- डूज अँड डोन्टचे फलक लावावेत
- रेक्टरने शिस्तीचे पालन करण्यासाठी वारंवार सूचना द्याव्यात

### महाविद्यालय आवार

- आवारात सॅनिटाइज मशिन लावावेत
- प्रवेश करणाऱ्यांचे तापमान मोजणे बंधनकारक
- हात धुण्यासाठी सोय करावी
- आवाराची वारंवार स्वच्छता करावी




### प्राचार्य, संचालक, अभ्यागत कक्ष

- दिवसातून किमान तीनवेळा खोली सॅनिटाइज करावी
- गर्दी टाळण्यासाठी भेटीसाठी वेळा निश्चित कराव्यात
- खुर्ची, सोफा, टेबल, काऊंटर वारंवार स्वच्छ करावे
- ऑनलाइन कामकाज करून गर्दी कमी करावी

### कॅन्टीन

- भाजी, धान्य व खाद्यपदार्थ स्वच्छ करावेत
- कॅन्टीनमध्ये कर्मचाऱ्यास मास्क अनिवार्य
- डिजिटल पेमेंटला प्राधान्य द्यावे
- क्षमतेपेक्षा जास्त लोकांना प्रवेश टाळावा

**Sakal: 30.5.2020**




*Other than the College Photos, Event Photos, newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*